सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा
7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

समता पतसंस्था
टेन्शन नाही, रिटर्न्स निवडा!
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
*नियम व अटी लागू
अहिल्यानगर : मार्केट यार्ड | प्रेमदान चौक | दिल्लीगेट
संपर्क : ७७२२ ०१० २२२ www.samatapat.com

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २१.०२.२०२६ | अंक नं. २६९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

## नोकरीला लावण्याच्या आमिषाने तरुणीवर अत्याचार; माजी महापौर अभिषेक कळमकरविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – अहिल्यानगर शहराचे माजी महापौर तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्यावर एका २५ वर्षीय तरुणीवर अत्याचार केल्याचा गुन्हा २१ फेब्रुवारी रोजी पहाटे ३.१५ वाजता एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. शाळेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून वारंवार अत्याचार केल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.

शिरूर (जि.पुणे) येथील तरुणीने याबाबत फिर्याद दिली आहे. पिडित युवती तीन महिन्यांपूर्वी नोकरीच्या शोधात असताना तिने सोशल मीडियाच्या माध्यमातून अभिषेक कळमकर यांच्याशी संपर्क साधला होता. नोकरीची गरज असल्याचे सांगितल्यानंतर कळमकर यांनी तिला कागदपत्रांसह भेटीसाठी अहिल्यानगरला बोलावले. एमआयडीसी परिसरातील स्वतःच्या शाळेत कामाला लावून देतो, असे सांगून त्यांनी पीडितेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर शाळा दाखवण्याच्या बहाण्याने तिला विळद घाट परिसरात नेले आणि तिथे शीतपेयातून गुंगीचे औषध देऊन तिच्यावर गाडीतच अत्याचार केल्याचे पीडितेने तक्रारीत नमूद केले आहे.

या घटनेनंतर कळमकर यांनी पीडितेला व्हिडिओ कॉल करून आणि धमकावून तिचा छळ सुरूच ठेवला. १८ फेब्रुवारी रोजी शिरूर येथील एका हॉटेलमध्ये कागदपत्रे घेण्याच्या बहाण्याने बोलावून तिथेही तिच्यावर जबरदस्तीने शरीरसंबंध प्रस्थापित केले व त्याचे चित्रीकरण केले. हे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. या कृत्याबाबत कोणाला सांगितल्यास पीडितेसह तिच्या मुलीला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. सततच्या त्रासाला कंटाळून अखेर पीडितेने एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

पीडित तरुणीने या संदर्भातील काही व्हिडिओ स्वरूपातील पुरावे पोलिसांकडे सादर केल्याची माहिती मिळत आहे. या आधारे पोलिसांनी कळमकर यांच्याविरुद्ध बीएनएस कलम ६४ (१), ६४ (२) (एम), ६९, ३५१ (२) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (ई) नुसार गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास तोफखाना पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

## दहावीच्या परीक्षार्थीला कॉपी देण्यास विरोध केल्याने होमगार्डला मारहाण

नगर – दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यास कॉपी देण्यास विरोध केल्याने होमगार्ड कृष्णा वांडेकर यांना मारहाण करून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन पळवून नेल्याची घटना पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथील श्री वृद्धेश्वर विद्यालयात २० फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास घडली. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

कृष्णा वांडेकर हे तिसगाव येथील वृद्धेश्वर हायस्कूलच्या पाठीमागच्या बाजूने दहावीच्या पेपरच्या वेळेला कर्तव्यवर हजर होते. दोघेजण मोटारसायकलवर कॉपी देण्यासाठी येथे आले, त्यावेळी कृष्ण वांडेकर यांनी त्यांना सांगितले की, तुम्ही येथून जा, कॉपी देऊ नका, याचा राग आल्याने तू आम्हाला ओळखत नाहीस, गणेश सचिन शिंदे व रोहित दिलीप खंदारे यांचे नाव तू ऐकले नाहीस का?, आम्ही तिसगावचे दादा असून, तू आम्हाला कॉपी द्यायला विरोध करू नको, असे म्हणत शिंदे व खंदारे यांनी वांडेकर यांना मारहाण केली.

या वेळी खंदारे याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची एक तोळ्याची चेन ओढून नेली. यावेळी तेथे असलेले त्यांचे इतर सहकारी तातडीने धावले, त्यामुळे या दोघांनी तेथून पळ काढला. होमगार्ड वांडेकर हे शासकीय काम करीत असताना त्यांच्या कामात अडथळा आणून चेन हिसकावून मारहाण केली. त्यामुळे त्यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनीगणेश सचिन शिंदे व रोहित दिलीप खंदारे (दोघे रा. तिसगाव, ता. पाथर्डी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

हॉटेल भारत भुवन दुर्गा लस्सीची
* स्पेशल/साधी लस्सी
* स्पेशल मँगो लस्सी
* स्पेशल अंजीर लस्सी
* स्पेशल गुलकंद लस्सी
पार्सल सुविधा उपलब्ध
स्वाद घेण्यासाठी अवश्य एकदा भेट द्या.
पत्ता : हॉटेल भारत भुवन, माळीवाडा वेशीजवळ, अहिल्यानगर

बाळांच्या वजन, उंची, भूक व प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी आजच भेट द्या.
सन-२०१० पासून
चिरायु
लहान मुलांचे क्लिनिक
(जन्मापासून ते १८ वर्षापर्यंत)
प्रसिध्द बालरोग तज्ञांचा सल्ला
शाखा १ – सबजेल चौक, तुळजाभवानी मंदिरासमोर (डायमंड बेकरी समोर) अहिल्यानगर
9527931384 / 8830400170

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

३१ वे पुण्यस्मरण

जिन्दगी का सफर ही थोडा अलग है ।
उस में अपने लोगों की यादों की नमी हमेशा है ।
स्व. रामचंद नवतनदास चुग
स्व.दि.२१/२/१९९५
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
- दुःखांकित -
चुग परिवार
फर्म : मदहोश वाईन्स
मंगलगेट, अहिल्यानगर

८ वे पुण्यस्मरण

स्व. गोपीनाथ भिकाजी मिसाळ
स्व. ता. २१/२/२०१८
आपल्या संस्काररूपी स्मृतींचा.. स्मृतीगंध आजही दरवळत आहे..
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच आम्हांला प्रेरणा देत आहे..
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली
* शोकाकुल *
समस्त मिसाळ परिवार..
सर्व मित्र परिवार..

३७ वे पुण्यस्मरण
जय हो ! पुत्र व्हावा असा गुंडा ज्याच्या हाती भगवा झेंडा

कै. धर्मवीर जगदीश भोसले
स्व.दि. २२.२.१९८९
३७ व्या पुण्यस्मरणदिनानिमित्त शनिवार दि. २१.२.२०२६ रोजी रात्री ८ ते १० वा. श्री संकट मोचन हनुमान संत्संग मंडळ यांचे हनुमान चालीसा व भजन संध्या तसेच रविवार दि. २२.२.२०२६ रोजी भंडाऱ्याचे आयोजन वेळ दु. १२ ते ३ वा. पर्यंत तरी सर्वांनी लाभ घ्यावा.
दुःखांकित वाणेश्वर तरुण मंडळ
धर्मवीर जगदीश भोसले चौक, गंजबाजार, अ.नगर
भोसले परिवार (फुटाणेवाले)

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

पाचवे पुण्यस्मरण
शुन्यातून विश्व निर्मुनी,
किर्ती सुगंधाचा वृक्ष फुलवूनी
लोभ, माया, प्रिती, देवूनी
सर्वांची मने जिंकूनी
सत्य सचोटीचा मार्ग देवूनी,
अमर जाहला आपण जीवनी
स्मृतीत दडल्या अनंत आठवणी..

आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रध्दांजली !
* दुःखांकित *
राजेश सुभाष रच्चा | आनंद सुभाष रच्चा
रेणुका अशोक बोगम | नरेंद्र सुभाष रच्चा
स्व. सुभाष नारायण रच्चा
स्व.दि. २२/०२/२०२१
समस्त रच्चा परिवार

॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

कै. बापूराव नामदेव शिंदे (आप्पा)
जन्म: १/१/१९४९ । स्वर्गवास दि. १४/२/२०२६
तुमचे चिंतन, तुमच्या स्मृति, आम्हाला त्यांचा आधार
आमच्या प्रत्येक आचार-विचारात तुमच्या प्रेरणेचा अविष्कार
आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली..
॥ दशक्रिया विधी ॥
सोमवार दि. २३/२/२०२६ रोजी, सकाळी ८.०० वाजता, स्थळ : अमरधाम, वाटेफळ, अहिल्यानगर येथे होईल.
* शोकाकूल *
समस्त शिंदे परिवार व ग्रामस्थ
वाटेफळ, अहिल्यानगर
प्रवचन सेवा :
ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज घोडके यांचे प्रवचन होईल

७ वे पुण्यस्मरण

भाग्यवान आम्ही पितृछत्र ऐसे लाभले
आशीर्वादाने आपल्या जीवन धन्य झाले
आजुनही वाटते तुम्ही सोबत आहात
पाठीवरुनी हात मायेचा
फिरवित आहात...
आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण आदरांजली..
स्व. भाऊसाहेब रामकृष्ण फुलसौंदर
* दुःखांकित *
स्व. दि. २२/०२/२०१९
श्रीमती अलका भाऊसाहेब फुलसौंदर
विठ्ठल बाबुराव जाधव | सौ. हर्षाली विठ्ठल जाधव
सम्राट अशोकराव अभंग | सौ. सिमा सम्राट अभंग
चि. विराज विठ्ठल जाधव | चि. पियुश विठ्ठल जाधव
चि. आर्यन सम्राट अभंग | चि. विश्वजीत (भैय्या) सम्राट अभंग
समस्त फुलसौंदर परिवार
स्व. भाऊसाहेब फुलसौंदर मित्र मंडळ
स्व. विकी (भैय्या) फुलसौंदर
फुलसौंदर चौक, समता कॉलनी, फुलसौंदर मळा, विनायकनगर परिसर, अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शेतकऱ्याच्या फळबागेतून सव्वा लाखाच्या संत्र्यांची चोरी

## काही तासांत आरोपीला मुद्देमालासह पोलिसांनी केले जेरबंद

नगर – जिल्हाभरात चोरीच्या घटनांनी शेतकरी धास्तावले असतानाच, आता चोरट्यांनी थेट फळबागांना लक्ष करण्यास सुरुवात केली आहे. नगर तालुक्यातील दशमीगव्हाण परिसरातून अज्ञात चोरट्यांनी एका शेतकऱ्याच्या बागेतील तब्बल १ लाख २० हजार रुपये किमतीची संत्री आणि प्लॅस्टिक कॅरेट लंपास केले आहेत. पोलिसांनी या चोरट्याचा तातडीने शोध घेत त्याला चोरलेल्या संत्र्यांसह शेंडी (ता.नगर) परिसरात पकडले आहे. इरफान बाबा शेख (रा. निंबोडी, ता.नगर, हल्ली रा. मुकुंदनगर) असे आरोपीचे नाव आहे.


शेतकऱ्याच्या फळबागेतून सव्वा लाखाच्या संत्र्यांची चोरी करणाऱ्या आरोपीला पकडल्या नंतर त्याच्या समवेत स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या सह नगर तालुका पोलिसांचे पथक.

याबाबत उक्कडगाव येथील शेतकरी पोपट पांडुरंग म्हस्के यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची दशमीगव्हाण शिवारात गट क्रमांक १४३ (१) मध्ये संत्रा बाग आहे. १९ फेब्रुवारीच्या रात्री ९ ते २० फेब्रुवारीच्या सकाळी ६ वाजेच्या दरम्यान चोरट्यांनी या बागेवर डल्ला मारला. चोरट्यांनी झाडावर असलेली १५०० किलो संत्री, ज्याची किंमत साधारण ८० रुपये प्रति किलोप्रमाणे १ लाख २० हजार रुपये आहे, ती चोरून नेली. एवढेच नव्हे तर, संत्री भरण्यासाठी लागणारे ४ हजार ९०० रुपये किमतीचे ९८ प्लॅस्टिक कॅरेट देखील चोरटे सोबत घेऊन गेले.

२० फेब्रुवारीला सकाळी म्हस्के हे बागेत संत्रा तोडण्यासाठी गेले असताना त्यांना ११० पैकी फक्त १२ मोकळे प्लॅस्टिक कॅरेट दिसले तसेच बागेतील झाडांना फळे दिसून आली नाहीत. शेतात त्यांना टेम्पोचे टायर मार्क दिसले. त्यामुळे त्यांची खात्री झाली की कोणीतरी रात्री त्यांच्या बागेतील संत्री तोडून चोरून नेली आहेत. याप्रकरणी शेतकरी पोपट म्हस्के यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

### पोलिसांच्या तत्परतेने शेतकऱ्याला मिळाला न्याय

घटनेचे गांभीर्य ओळखून आणि शेतकऱ्याच्या घामाचा दाम त्यांना मिळवून देण्यासाठी नगर तालुक्याचा नव्यानेचे पदभार घेतलेले सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गोपनीय माहिती काढत सदर गुन्हा हा इरफान शेख आणि त्याच्या साथीदारांनी केल्याचे निष्पन्न केले. इरफान शेख याचे लोकेशन काढले असता सायंकाळी तो चोरलेले संत्रे विकण्यासाठी शेंडी परिसरात गेला असल्याची माहिती मिळाली. वारुळे यांनी लगेच पथकाला कारवाई साठी पाठविले. पथकाने शेंडी परिसरात जावून आरोपी इरफान शेख यास चोरलेले संत्रे टेम्पो मध्ये घेवून विक्री साठी जात असताना पकडले. त्याच्या कडून संत्रे व टेम्पो असा ३ लाख २० हजार ४५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर कारवाई स.पो.नि. गणेश वारुळे यांच्यासह पोलिस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, शैलेश सरोदे, महेश भवार, नितीन शिंदे, सुभाष थोरात, मंगेश खरमाळे, रघुनाथ कुलांगे, विक्रांत भालसिंग, विकास शिंदे यांच्या पथकाने केली आहे.

# तुमची निवृत्ती योजना खरोखर तयार आहे का?


राजन कुटे

बहुतेक लोकांना वाटतं की त्यांची निवृत्तीची योजना तयार आहे. काही गुंतवणूक आहे. काही पॉलिसी आहेत. पुढे किती रक्कम लागेल याचा साधारण अंदाज आहे. काहींनी तर एक आकडा मनात ठरवून ठेवलेला असतो.हे सगळं आश्वासक वाटतं.पण एक प्रश्न मात्र शांतपणे विचारायला हवा.

आपली योजना खरोखर तयार आहे का? निवृत्ती नियोजन आपण अनेकदा फक्त बचतीशी जोडतो. ठराविक रक्कम जमा करा, लक्ष्य गाठा आणि मग निर्धास्त व्हा.

पण निवृत्ती म्हणजे केवळ एक आकडा गाठणे नाही. ती आयुष्याच्या नव्या टप्प्यात प्रवेश आहे.कामाच्या काळात नियमित उत्पन्न येत असतं. बाजार वरखाली झाले तरी पगाराचा आधार असतो. चूक झाली तर सुधारण्याची संधी असते. वेळ आपल्याकडे असतो.

निवृत्तीनंतर चित्र बदलतं.आपण पैसा वाढवण्याऐवजी त्यावर अवलंबून राहायला सुरुवात करतो.हा बदल मोठा असतो.अनेकांची गुंतवणूक रचना वाढीसाठी तयार केलेली असते. पण ती नियमित उत्पन्नासाठी, ठराविक रक्कम काढण्यासाठी किंवा बाजारातील चढउतार सहन करत पैसे वापरण्यासाठी तयार असतेच असं नाही.आणि इथेच अस्वस्थता सुरू होते.काही जण चाळिशीत जशी गुंतवणूक होती तशीच साठीत ठेवतात. काही जण भीतीपोटी सगळे पैसे पूर्ण सुरक्षित पर्यायात हलवतात. दोन्ही टोकं योग्य नाहीत.

तयार योजना म्हणजे संतुलन. तत्काळ गरजांसाठी स्थैर्य हवं. पुढील काही वर्षांसाठी निश्चितता हवी. आणि दीर्घकाळासाठी वाढही हवी – कारण आजची निवृत्ती वीस–पंचवीस वर्षे सहज असू शकते.

एक साधा पण महत्त्वाचा प्रश्न आहे – पैसे काढणार कसे? कोणत्या गुंतवणुकीतून? कोणत्या क्रमाने? बाजार खाली असताना देखील तीच गुंतवणूक वापरणार का?

स्पष्टता असेल तर चिंता कमी होते.निवृत्ती ही आर्थिक जितकी आहे तितकीच मानसिकही आहे. दशकानुदशके काम आपली ओळख ठरवतं. निवृत्तीनंतर तो आधार बदलतो. जर आर्थिक रचना स्पष्ट नसेल, तर असुरक्षितता वाढते.

खऱ्या अर्थाने तयार असलेली निवृत्ती योजना तीन शांत प्रश्नांची उत्तरं देते. माझे पैसे पुरतील का? माझं जीवनमान स्थिर राहील का? बाजार बदलले तरी मी शांत राहू शकेन का? जर या प्रश्नांची उत्तरं केवळ आशेवर आधारित असतील, तर योजनेचा पुनर्विचार करायला हवा. निवृत्तीची तयारी म्हणजे फक्त मोठा आकडा नाही.

ती आत्मविश्वास देणारी रचना आहे.बाजार बदलतील. महागाई राहील. आयुष्य आपल्याला आश्चर्य देत राहील. तयार योजना अनिश्चितता पूर्णपणे दूर करत नाही.

ती, ती नियंत्रित करण्यास मदत करते. कारण निवृत्ती म्हणजे कमाई थांबणे नाही. ती पैशावर अवलंबून राहण्याची सुरुवात आहे.

स्पष्ट ठेवा. शांत ठेवा.

**राजन कुटे, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक**
**मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०**

# ‘अ–ब–क–ड’ पद्धतीने उपवर्गीकरण तातडीने लागू करा ... अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रभर ‘तीव्र आंदोलन’ छेडणार

## सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतरही राज्य सरकार गप्प का?, अहिल्यानगरमधून समाजाचा पाठिंबा : आमदार अमित गोरखे

नगर – सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी अनुसूचित जाती व जमातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण (Sub-classification) करण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय दिल्यानंतर देशभरात या विषयावर चर्चा सुरू झाली आहे. या निर्णयानुसार राज्य सरकारांना अनुसूचित जाती व जमातींमधील आरक्षणाचा लाभ न मिळालेल्या किंवा अल्प प्रमाणात मिळालेल्या घटकांना प्राधान्य देण्यासाठी उपवर्गीकरण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तेलंगणा राज्याने या निर्णयाची अंमलबजावणी करून देशात पहिल्यांदाच उपवर्गीकरण लागू केले आहे. मात्र महाराष्ट्रात अद्याप या संदर्भात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने समाजात नाराजी वाढत आहे.

अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गातील ५९ पोटजातींना आरक्षणाचा समन्यायी लाभ मिळावा यासाठी ‘अ–ब–क–ड’ पद्धतीने उपवर्गीकरण तातडीने लागू करण्याची मागणी आमदार अमित गोरखे यांनी केली आहे. राज्य सरकारने याबाबत सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.



अहिल्यानगरमधील समाजाच्या वतीने या भूमिकेला एकमुखी पाठिंबा दर्शविण्यात आला आहे. सुनील शिंदे, जयवंत गायकवाड, किरण कंगरे, प्रवीण वैरागर, सिताराम शिरसाठ, लखन साळवे, संतोष उमाप, राजाराम काळे, अभी मिसाळ आणि लक्ष्मण निक्षे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, ५९ पोटजातींना न्याय मिळावा यासाठी ही लढाई आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

आमदार अमित गोरखे यांनी ‘अ–ब–क–ड’ आरक्षणासाठी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने आंदोलने केली आहेत. विशेषतः २०२३ आणि २०२४ मध्ये हा लढा अधिक तीव्र झाला. २० मे २०२५ रोजी मातंग समाजाच्या वतीने मंत्रालयावर महाआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या आंदोलनात आमदार गोरखे यांनी पुढाकार घेतला होता. त्यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून मातंग समाजाच्या मागण्यांवर तातडीने चर्चा करण्यासाठी बैठक घेण्याची विनंती केली होती.

डिसेंबर २०२५ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनातही आमदार गोरखे यांनी हा मुद्दा प्रभावीपणे मांडला. आपल्या शर्टवर ‘अ. ब. क. ड.’ अशी अक्षरे छापून त्यांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर ठिय्या आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले होते. पावसाळी आणि हिवाळी दोन्ही अधिवेशनांत त्यांनी हा विषय सातत्याने उपस्थित ठेवला आहे.

आमदार गोरखे यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने उपवर्गीकरणाला कायदेशीर मान्यता दिली आहे. मातंग, चर्मकार, वाल्मिकी, मादिगा यांसह ५९ जाती या निर्णयाच्या अंमलबजावणीची प्रतीक्षा करत आहेत. आरक्षण हा केवळ धोरणात्मक विषय नसून तो वंचित समाजाच्या भविष्याशी निगडित आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या मूळ आरक्षणाला १०० टक्के न्याय मिळावा, ही माझी भूमिका आहे. आरक्षण असूनही ५९ पोटजातींमधील बांधव शिक्षण व नोकरीपासून वंचित राहत असतील, तर त्यांच्या हक्कासाठी मी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. आमदार गोरखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे यापूर्वी अनेक वेळा हा विषय मांडला असून, मुख्यमंत्री यांनीही याबाबत गांभीर्याने विचार करून लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस घोषणा न झाल्याने समाजात असंतोष वाढत आहे.

सरकारला पुन्हा एकदा रीतसर निवेदन पाठविण्यात येणार असून, त्यानंतरही सकारात्मक निर्णय न झाल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. मी केवळ आमदार म्हणून नव्हे, तर वंचित समाजाचा प्रतिनिधी म्हणून मोठा निर्णय घेईन, असे शब्दांत आमदार अमित गोरखे यांनी सांगितले.

**प्रमुख मागण्या :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार SC उपवर्गीकरण तातडीने लागू करावे., ५९ पोटजातींपैकी अत्यंत मागास व वंचित घटकांना प्राधान्य देणारे ‘अ–ब–क–ड’ वर्गीकरण जाहीर करावे., या संदर्भात स्थापन केलेल्या समितीचा अहवाल लवकरात लवकर सादर करून निर्णय प्रक्रियेला गती द्यावी., न्यायालयीन आदेशाचे काटेकोर पालन करून उपेक्षित समाजाला मुख्य प्रवाहात आणावे.

## राजेश धुप्पड यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – येथील सिव्हील हडको कॉलनीतील साधु वासवानी हौ. सो.तील रहिवासी राजेश किशनलाल धुप्पड (वय ६६) यांचे २१ फेब्रुवारी रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, नातवंडे, १ भाऊ, १ बहिण, भावजय असा परिवार आहे. जुना बाजार येथील गिता एजन्सी व कृष्णा मेडीकलचे ते संचालक होत. रोहन धुप्पड यांचे ते वडील तसेच योगेश धुप्पड यांचे मोठे बंधू होत.

## शाहुराव राळेभात यांचे वृद्धापकाळाने निधन



जामखेड – राळेभात वस्ती येथील रहिवासी शाहूराव बाबूराव राळेभात (वय ९५) यांचे २० फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर राळेभात वस्ती (ता.जामखेड) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ४ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गौतम, शहाजी, संपत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मधुकर राळेभात यांचे ते वडील होत.

## राजेशभाई ठक्कर यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – अशोका रेसिडेन्सी, उत्सव मंगल मंगल कार्यालय जवळ, वॉर्ड नं. ७ येथील रहिवाशी मेनरोड येथील पूर्वीचे गणेश लॉजचे मालक राजेशभाई नारायणभाई ठक्कर (वय ६३) यांचे अल्पश: आजाराने दु:खद निधन झाले.



**हनुमान चालिसा पाठ**
**रविवार दि. २२/०२/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**
**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**हरिष हस्मतराय भागवानी परिवार,** श्री अपार्टमेंट, एल.आय.सी. कॉलनी, प्रोफेसर चौक, सावेडी
**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**
**राजकुमार जोशी,** (बन्सी महाराज) सरदार पटेल रोड, आडते बाजार, ९८६०५६६५०९



**हनुमान चालिसा पाठ**
**सोमवार दि. २३/०२/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**
**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**शिवप्रताप सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट,** जुना मंगळवार बाजार, होशिंग हॉस्पिटल समोर (परिसरातील सर्व श्रीराम भक्त)
**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**
**श्री. शंकर रामगोपाल टाक,** गुलमोहर रोड, प्लॉट नं.०३, मंगल हाऊसिंग सोसा., श्री. रविराज शंकर टाक ९८९०९१४३१२

## भिंगारमध्ये पेटवून घेतलेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर – भिंगार मधील लक्ष्मीनगर येथील पेटवून घेतलेल्या तरुणाचा जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. सुरज अशोक नन्नवरे (वय २६) असे या मयत तरुणाचे नाव आहे.

सुरज याने राहत्या घरी १९ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ च्या सुमारास स्वत:च्या अंगावर काही तरी ज्वलनशील पदार्थ ओतून घेवून पेटवून घेतले होते. त्यात तो गंभीर जखमी झाला होता. त्यास त्याचे नातेवाईकांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. तेथे उपचार सुरु असताना त्याचा २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११.५५ च्या सुमारास मृत्यू झाला. याबाबतचा अहवाल मेडिकल ऑफिसर डॉ. अमोल कोठुळे यांनी पोलिसांना दिला. त्यानुसार भिंगार कॅम्प पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## रंजनाताई कवाडे यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. रंजनाताई कवाडे (वय ७७) यांचे २१ फेब्रुवारी रोजी पहाटे नागपूर येथे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नागपूर येथील मोक्षधाम घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, मुलगा, मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या त्या पत्नी तर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष जयदीप कवाडे यांच्या त्या मातोश्री होत.


रंगारगल्ली येथील एसटी महाले मंगल कार्यालय येथे सकल माळी समाजाच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्ण कृती पुतळा उभारणी लवकर करावा. यासाठी सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

# क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणीसाठी सकल माळी समाज एकवटला

## थोर समाजसुधारक महात्मा फुले व सावित्रीबाई फुले हे सर्व समाजाचे दैवत : बाळासाहेब भुजबळ

नगर – क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणीचे भूमीपूजन तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. माळीवाडा येथे फुले दाम्पत्यांचे भव्यदिव्य असे स्मारक होत आहे. ही माळी समाजासाठी भुषणवाह बाब आहे. आमदार संग्राम जगताप यांनी स्मारकाच्या कामासाठी मोठा निधी दिल्याने शहराच्या वैभवात भर पाडणारे भव्य दिव्य असे स्मारक उभे राहणार आहे. हे स्मारक लवकरात लवकर पूर्ण व्हावे. यासाठी सकल माळी समाज एकवटला आहे. हे स्मारक अत्यंत देखणे व भव्य दिव्य व्हावे यासाठी माळीवाडा परिसरात काही अतिक्रमणे हटविण्यात यावी. अशी सकल माळी समाजाची मागणी आहे. फुले दाम्पत्यांनी सर्व समाजासाठी ज्ञानाची द्वारे खुली केली आहेत. थोर समाजसुधारक महात्मा फुले व सावित्रीबाई फुले हे सर्व समाजाचे दैवत आहेत. स्मारक उभारणीच्या कामात येणारे अडथळे सोडविण्यासाठी महात्मा फुले यांच्या अनुयायी यांना सोबत घेऊन लढा उभारला जाईल, असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी केले आहे.

रंगारगल्ली येथील एसटी महाले मंगल कार्यालय येथे सकल माळी समाजाच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्ण कृती पुतळा उभारणी लवकर करावा. यासाठी सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सचिव राजेंद्र पडोळे, बाजार समितीचे संचालक संतोष म्हस्के, विश्वस्त विनोद पुंड, डॉ.रणजीत सत्रे, अर्जुन बोरुडे, कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे, संजय गारुडकर, राजेंद्र ताठे, अशोक आगरकर, श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त पंडितराव खरपुडे, फुले ब्रिगेडचे अध्यक्ष दीपक खेडकर, महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे, अमोल भांबरकर, माळी महासंघाचे मनोज फुलसौंदर, मनोज भुजबळ, कॅप्टन सुधीर पुंड, सुरेश कावळे, प्रसाद कोके, चंद्रकांत पुंड, राजाराम चिपाडे, प्रकाश शिंदे, डॉ.दामोदर कळमकर, रमेश चिपाडे, भास्कर चौधरी, रोहित पठारे, जालिंदर बोरुडे, अर्जुन गोंधळे, अभय दातरंगे, रामदास फुले, कुंडलिक गदादे, विवेक फुलसौंदर, दिनेश कापरे, बाबासाहेब दळवी आदी उपस्थित होते.

किशोर डागवाले म्हणाले, महात्मा फुले व सावित्री बाई फुले यांचा पूर्ण कृती पुतळा लवकर उभारण्यात यावा अशी सर्व समाजाची मागणी आहे. फुले दांपत्यांचे भव्यदिव्य असे स्मारक व्हावे. अशी सर्व नगरकरांची भावना आहे.या उभारणीच्या कामात येणारे सर्व अडथळे दूर करण्यासाठी सकल माळी समाजाचे शिष्टमंडळ सर्व समाजाच्या विविध नेत्यांच्या गाठीभेटी घेतील.

पंडितराव खरपुडे म्हणाले, फुले दांपत्यांचे माळीवाडा येथे होणारे स्मारकामूळे शहराच्या वैभवात भर पडेल. माळीवाडा चौकातून श्री विशाल गणपती मंदिर, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, वाडीया पार्क, जिल्हा परिषद अशी पाच रस्ते जातात. या पाचही रस्त्यावरून हे स्मारक दिसावे.

यावेळी संजय गारुडकर, दिपक खेडकर, डॉ. दामोदर कळमकर, अर्जुन बोरुडे, डॉ.रणजीत सत्रे, अमोल भांबरकर, जालिंदर बोरुडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक राजेंद्र पडोळे यांनी केले. विनोद पुंड यांनी आभार मानले.

# जनावरांची वाहतूक करणारा टेम्पो नगरमध्ये पकडला; १४ गावरान बैलांची सुटका, ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शहरातील पत्रकार चौक परिसरात जनावरांची अत्यंत क्रूरपणे आणि दाटीवाटीने वाहतूक करणारा एक आयशर टेम्पो तोफखाना पोलिसांनी कारवाई करून पकडला आहे. या कारवाईत सुमारे ६ लाख ४० हजार रुपये किमतीच्या मुद्देमालासह १४ गावरान बैलांची सुटका करण्यात आली आहे. २० फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास पत्रकार चौक येथे ही कारवाई करण्यात आली.

पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल अविनाश अशोक वडे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. पत्रकार चौक येथे आयशर टेम्पो (क्र. एम.एच. ४२ ए.क्यू. ७७३२) संशयास्पदरीत्या आढळून आला. तोफखाना पोलिसांनी तो थांबवून पाहणी केली असता टेम्पोमध्ये ६ पांढरे, ५ काळे आणि ३ तांबड्या रंगाचे असे एकूण १४ बैल कोणत्याही चाऱ्यापाण्याशिवाय आणि विनापरवाना निर्दयपणे कोंबलेले होते. या प्रकरणी पोलिसांनी चालक रामदास हसाळे (रा. चांदवड, नाशिक) याच्यासह छोटू विठ्ठल ठाकरे, समाधान रवींद्र ठाकरे, संपत शांताराम पवार, किरण गंगाराम पवार आणि विशाल पंडित सोनवणे (सर्व रा. धुळे) या सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपींवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम आणि मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भांवळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल योगेश चव्हाण या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. सर्व जनावरे कारखान्याच्या कामासाठी नेली जात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मात्र त्यांच्याकडे जनावरे वाहतुकीचा कुठलाही परवाना आढळून आला नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### आरोग्यदायी मेथीदाणे

अनेक घरगुती उपायांमध्ये मेथी दाणे हा सर्वात लोकप्रिय आणि प्रभावी पदार्थ म्हणून ओळखला जातो. किचनमध्ये सहज उपलब्ध असलेला हा एकच पदार्थ रोज सकाळी रिकाम्या पोटी घेतल्यास पचनक्रिया सुधारते, मेटाबॉलिझम वाढते, भूक नियंत्रणात राहते आणि पोटावरील जिद्दी चरबी कमी होण्यास मदत होते. अनेक स्त्रोतांनुसार आयुर्वेदिक आणि न्यूट्रिशन तज्ज्ञांच्या मते मेथीदाण्यांचे पाणी किंवा भिजवलेले मेथीदाणे ७-१० दिवस नियमित घेतल्यास वजन आणि पोटाचा घेरा लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो. पोट भरलेले राहते, जास्त खाण्याची इच्छा कमी होते. इन्सुलिन संवेदनशीलता वाढवते, चरबी साठण्यास प्रतिबंध. शरीरातील विषारी घटक बाहेर काढते, सूज कमी करते. चरबी जाळण्याची प्रक्रिया वेगवान होते. विशेषतः बेली फॅटवर प्रभावी ठरते.

## पाककला

### रोझ टी

**साहित्य** : दूध १ कप, पाणी १/२ कप, गुलाबाच्या पाकळ्या १ चमचा, चहाची पाने १ चमचा, साखर चवीनुसार

**कृती** : सर्वात आधी ताज्या गुलाबाच्या पाकळ्या चांगल्या प्रकारे धुवा. आता एक भांडे घ्या आणि त्यात दूध आणि पाणी घाला. यानंतर, ते मंद आचेवर ठेवा आणि मिश्रण हळूहळू गरम होऊ द्या. दूध जळू नये म्हणून अधूनमधून ढवळत रहा. दूध उकळू लागले की, गुलाबाच्या पाकळ्या घाला. मंद आचेवर २ मिनिटे शिजवा, दुधाला सौम्य गुलाबाचा सुगंध येऊ द्या. आता चहाची पाने घाला आणि २-३ मिनिटे उकळवा. चहा जास्त वेळ उकळू देऊ नका, अन्यथा ती कडू वाटू शकते. चवीनुसार साखर घाला आणि चांगले ढवळून घ्या. नंतर, गॅस बंद करा आणि तयार केलेला चहा गाळणीचा वापर करून एका कपमध्ये गाळा. तर चला तयार आहे व्हॅलेंटाईन डे स्पेशल गुलाबाचा चहा, २-३ गुलाबाच्या पाकळ्यांनी सजवा.

## वास्तू

### 'विधीशूल' वर उपाय

* टी-पॉइंट वरील घर किंवा भूखंडावर रस्ता थेट येऊन मिळतो, ज्याला वास्तूशास्त्रात 'विधी शूल' मानले जाते. हे स्थान रहदारी, आवाज आणि नकारात्मक ऊर्जा (तणाव, आर्थिक समस्या) वाढवणारे असू शकते। यावरील नकारात्मक परिणाम कमी करण्यासाठी मुख्य दारावर नऊ-अंगुलीचे बालेकिल्ले, पिरामिड किंवा स्वस्तिक लावणे फायदेशीर ठरते.

* घराच्या मुख्य दरवाजावर किंवा टी-पॉइंटच्या दिशेने असणाऱ्या भिंतीवर वास्तू पिरामिड, स्वस्तिक लावावे.

## सौंदर्य

कलौंजीच्या बिया मधात मिसळूनही लावता येतात. यासाठी थोडे निगेला तेल घ्या आणि नंतर त्यात एक चमचा मध मिसळा. आता ते तुमच्या टाळूवर लावा आणि अर्धा तास राहू द्या. नंतर केस सौम्य शाम्पूने धुवा.

## सल्ला

* आमरस किंवा आंब्याचे कोणतेही पदार्थ धातूच्या भांड्यात साठवून ठेवू नका. त्याचा रंग बदलण्याची शक्यता असते.

* बदामाची साले लवकर निघावीत यासाठी १५ ते २० मिनिटे गरम पाण्यात भिजवून ठेवा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन शुक्लपक्ष, अश्विनी १७।५५, सूर्योदय ०६ वा. ३९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : मनोरंजनावर खर्च होण्याची शक्यता आहे. प्रेमात स्थिती अनुकूल राहील.

**वृषभ** : सर्व कामे योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी आज आपण नियोजन कराल. वाहने काळजीपूर्वक चालवा. आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा.

**मिथुन** :महत्वाच्या एखाद्या सामुदायिक योजनेत इतर लोकांबरोबर आपले सहकार्य तुमची उत्तम राजकीय जाण दाखवेल. देवाण-घेवाणीबाबत काळजीपूर्वक व्यवहार करा.

**कर्क** : स्थिती अनुकूल राहील. दिवस उत्तम राहील. वरिष्ठ लोकांचे कामात सहकार्य मिळेल. नवीन करार होतील. वडिलधाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**सिंह** : इतर लोकांना तुमचे विचार पटतील. नोकरदारांनी कामात लक्ष द्यावे. अधिकारी आपणास सहकार्य करतील. आपल्या आरोग्याची काळजी घ्या.

**कन्या** : मुलांवर खर्च होईल. महत्वपूर्ण कामे यशस्वीरित्या पूर्ण होतील. आरोग्य उत्तम राहील.

**तूळ** : अधिकाऱ्यांशी वाद-विवाद टाळण्याचे प्रयत्न करा. विरोधक पराभूत होतील. व्यापार व्यवसायात सावध राहाणे आवश्यक.

**वृश्चिक** : आरोग्य उत्तम राहील. नवीन व्यावसायिक माहिती मिळेल. एखाद्या महत्वाच्या प्रोजेक्टमध्ये यश मिळेल. इच्छित कार्यात यश मिळेल. कौटुंबिक जबाबदारी वाढेल.

**धनु** : कामात अत्यंत व्यस्त राहाल. खर्च वाढेल. महत्वाच्या कार्यात यश मिळेल. आपल्या प्रकृतीची काळजी घ्या.


**मकर** : कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. वेळेचे भान पाळा. आरोग्य उत्तम राहील. शत्रूंपासून सावध राहा. महत्वाच्या कामात सावधगिरी बाळगा.

**कुंभ** : अत्यंत व्यस्त राहाल. मनोरंजनावर खर्च होईल. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. राजकीय कार्ये पूर्ण होतील.

**मीन** : अधिकार क्षेत्र वाढेल. शत्रूंना भीती वाटेल. आनंद वाढेल. आर्थिक स्थिती संमिश्र राहील.

# शब्दगंध क्र. ७३७२

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) निवारण करणारा ४) महसूल; कर; संपूर्ण ६) थंड; शीत; एक प्रकारचा दगड ७) दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा ९) मस्ती; जोर; पांघरण्याचे एक जाड व उबदार वस्त्र १०) एक देव; विष्णू ११) मुभा; मोकळीक; स्वातंत्र्य १४) ओटा; पार १५) दोन किंवा अधिक शब्दांचा मिळून बनलेला एक शब्द १८) अनेक रस्ते एकत्र येतात ते ठिकाण; जकात वसुलीचे स्थान १९) माणूस; कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात २०) जलाशय; तळे; तलाव २२) नवऱ्याची दुसरी बायको २३) भरपूर; खूप; पुष्कळ

**उभे शब्द :-** १) जतन; काळजी २) वारीला जाणारा ३) कमरेला बांधावयाचा पट्ट्यासारखा एक दागिना; माचपट्टा ४) सावध रहा; खबरदार ५) चिखल; होळीची खाच ८) मोठे गाव; शहर १०) उत्कट इच्छा; छंद; हाव १२) धागा; तंतू; दोरा; सूत १३) गीत किंवा गेय काव्य रचणारा किंवा लिहिणारा १४) व्यायाम; सर्कस वगैरेतील शरीराच्या विशिष्ट हालचाली १६) माणूस; मनुष्य १७) उणीव; कमतरता; वानवा १८) अप्रीती; आवड नसणे २१) शरीर प्रकृतीत निर्माण होणारी विकृती

### शब्दगंध क्र. ७३७१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चं | पा | क | ली | ■ | स | मा | स |
| प | त | ■ | ल | स | ल | शी | त |
| क | ■ | मा | या | ■ | वा | ■ | ल |
| ■ | म | धा | ■ | प | र | वे | ज |
| अ | ज | र | म | र | ■ | ता | ■ |
| घा | ल | ■ | त | ■ | म | ळ | भ |
| न | ■ | स | द्दा | चा | र | ■ | र |
| क | स | दा | र | ■ | वा | क | डा |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : हरलात तरी चालेल फक्त जिंकणारा स्वत:हून म्हटला पाहिजे हा खेळ आयुष्यातील सर्वात कठीण खेळ होता.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### हेलिकॉप्टर आणि विमानामध्ये काय फरक आहे?

हेलिकॉप्टर आणि विमान या दोन्ही हवेतून प्रवास करणाऱ्या यंत्रांमध्ये मुख्य फरक त्यांच्या उड्डाण पद्धतीत आहे. हेलिकॉप्टर वरच्या दिशेने टेक-ऑफ आणि लँडिंग करते आणि हवेत एका जागी स्थिर राहू शकते, तर विमानाला धावपट्टीची गरज असते आणि ते सतत पुढे सरकत राहते.

उड्डाण आणि लँडिंग: हेलिकॉप्टर सरळ वर-खाली होऊ शकते, तर विमानाला टेक-ऑफ/लँडिंगसाठी धावपट्टीची गरज असते.

हवेतील स्थिती: हेलिकॉप्टर हवेत एकाच ठिकाणी थांबू शकते, जे विमान करू शकत नाही.

विमाने अधिक वेगवान असतात आणि लांबच्या प्रवासासाठी योग्य असतात, तर हेलिकॉप्टर कमी अंतरासाठी आणि दुर्गम भागात वापरले जातात.

हेलिकॉप्टरला वर एक मुख्य रोटर (पंखे) असते, तर विमानाला स्थिर पंख आणि इंजिन असतात.

हेलिकॉप्टर पुढे, मागे, डावीकडे आणि उजवीकडे कोणत्याही दिशेने उडू शकते.

थोडक्यात सांगायचे तर, जर तुम्हाला एका ठिकाणाहून सरळ वर जाऊन हवेत थांबायचे असेल तर हेलिकॉप्टर योग्य आहे, आणि जर तुम्हाला लांबचा प्रवास वेगाने करायचा असेल तर विमानाचा पर्याय उत्तम आहे.

### बंधूप्रेम

रामायण मधील प्रत्येक पात्र आपल्याला शिकवण देते. श्रीरामाच्या शोधात रामबंधू भरत त्यांच्या संपूर्ण हत्ती, घोडे आणि पुरोहितांच्या सैन्यासह दंडक वनाकडे निघाले. जेव्हा त्यांनी श्रीरामांना पाहिले तेव्हा ते त्यांच्याकडे आणि आपली आई कैकयीच्या वागण्याबद्दल माफी मागू लागले.

भरताने श्रीरामाला दशरथाच्या मृत्युची माहितीही दिली. ही माहिती ऐकून श्रीराम, लक्ष्मण आणि सीता यांना खूप दुःख झाले. भरतने विनंती केली, मी अयोध्येच्या लोकांकडून आलो आहे. अयोध्येचे सिंहासन तुमची वाट पाहत आहे. कृपया येऊन त्यावर बसा.

रामने उत्तर दिले, मी फक्त माझ्या पालकांची इच्छा पूर्ण करत आहे.

भरताला समजले की श्रीराम अयोध्येला परतणार नाही. तेव्हा ते म्हणाले की जोपर्यंत श्रीराम अयोध्येत येत नाही तोपर्यंत सिंहासनावर ते श्रीराम यांच्या पादुका ठेवून राज्य करतील. श्रीरामांनी भरताला त्यांच्या पादुका दिल्या. भरत अयोध्येत परतले आणि त्यांनी श्रीरामाच्या पादुका सिंहासनावर ठेवल्या.

तसेच श्रीराम बंधु भरत यांनी देखील वस्त्र, आभूषण, अलंकार यांचा त्याग करून साधी वेशभूषा केली व १४ वर्ष योग्य पद्धतीने अयोध्येचा कारभार सांभाळला. भरत यांना श्रीरामप्रती खूप आदर होता.

तात्पर्य: भरत यांचे बंधुप्रेम खूप मोठे होते. प्रत्येकाने सर्वांप्रती आदर ठेवायला हवा.

## जीवन का अमृत (भाग १)



उसका रक्षात्मक हाथ आपको हर प्रकार के डरावने खतरों से बचाएगा वह आपको कभी नहीं छोड़ेगा और आपको सदा के लिए प्रभु के गौरवपूर्ण साम्राज्य में ले जाएगा। सत्गुरु, क्राईस्ट-शक्ति से एकमेक है और वह प्रभु द्वारा चुने गए इंसानी चोले के जरिये प्रभु की ज्योति को चारों ओर फैलाता है। सत्गुरु को शिष्यों के प्रेम की जरूरत नहीं है। उसे प्रभु का प्रेम प्राप्त है और वह प्रेम का अवतार है। सच्चा गुरु शिष्य को अपने आपसे नहीं जोड़ता, वरन् अपने आप में कार्यरत क्राईस्ट- शक्ति (प्रभु-सत्ता) से जोड़ता है। ईसामसीह (क्राइस्ट) ने कहा, पुत्र पिता को जानता है और पिता पुत्र को जानता है और उन सभी को, जिन्हें पुत्र प्रकट करा दे। सभी सत्गुरु इस बात से सहमत हैं। इस बात का कोई अपवाद नहीं है और हम दूसरों की बातों के बहकावे में नहीं आएँ। यह प्रकृति की देन है और उसकी और देनों की तरह से, यह भी सत्गुरुओं द्वारा मुफ्त बाँटी जाती है।

### प्रभु-सत्ता

उन बातों की फिक्र न करो, जो कि निकट या दूर भविष्य में घटित हो सकती हों। सत्गुरु हमेशा अपने बच्चों की भली-भाँति रक्षा करता है। अविचलित रहो और अपना कार्य जारी रखो।

आपकी सड़क सीधी और साफ है १ सत्गुरु के प्रेम और दया से चलते रहो।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

या हारमोन उत्पन्न करती है। जिस से शरीर के सम्बंधित भाग प्रभावित होते हैं।

सहस्त्रार चक्र के ५ एरियल पांच तत्वों से जुड़े हुए हैं। हर घंटे में एक बार हमारा मन २० मिनट, १६ मिनट, १२ मिनट, ८ मिनट और ४ मिनट पृथ्वी, जल, अग्नि, वायु और आकाश तत्व से सूक्ष्म शक्ति खींचता है। अगली बार यह चक्र उल्टा चलता है ४, ८, १२, १६, २० मिनट आकाश, वायु, अग्नि, जल और पृथ्वी तत्व से जुड़ता है। यह क्रिया २४ घंटे चलती रहती है।

### सिद्धियां

जिस सिद्धि के लिए हम साधना करते हैं, उसके लिए हमारे सहस्त्रार चक्र में ऐसे एरियल हैं जो उन महाशक्तियों से सम्पर्क करते हैं और उन महाशक्तियों से शक्ति प्राप्त करते हैं जिनसे हमें सिद्धियां प्राप्त हो जाती हैं। आप जो भी सिद्धि चाहते हैं उस पर ५ मिनट अगर हम रोजाना अभ्यास करते रहें तो उस सिद्धि को प्राप्त कर लेंगे।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गण्या - मी एक शोध लावला.... मन्या - कोणता ?

गण्या - थंडीच्या दिवसात...एखाद्या माणसाच्या अंगावर...थंड पाणी टाकले तर..... तो गरम होतो

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* ऑलिम्पिक जागतिक हिवाळी क्रीडा स्पर्धा कोठे आयोजित करण्यात आल्या आहेत? - इटली

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास - 'राजं, तुम्ही याच...'

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती जोरदार साजरी झाली. पारंपारिक वाद्यासह डीजेच्या दणदणाटात. डीजेच्या आवाजाचा अनेकांना त्रासही झाला पण नाचणारी तरुण मंडळी कुणाचाही विचार करणारी नव्हती. ह्यांच्यातले काही तरुण इतरांना समजुन घेण्याच्या पलिकडे गेलेले होते. शांताबाईच्या गाण्यावर, इतरही धांगड धिंग्याच्या गाण्यावर नाचणारी ती तरुण पोरं पाहुन पेन्शनर मंडळी नाईलाजाने जे नाचणं चाललं होतं ते पाहात होती. त्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला असता तरी काहीही उपयोग झाला नसता कारण जयंती साजरा करण्यामागचा उद्देश ज्यांना समजत नाही त्यांना सांगणार कोण ? एखाद्याने सांगितलं तरी ऐकणार कोण ? कधी कधी आपल्याला जे चाललं आहे ते अगदी मनापासून पटत नसतं. ते पाहुन खुप दुःख होतं असतं पणं आपलं दुःख पाहायला कुणालाही वेळ नसतो आणि आपलं दुःख, दुःखी चेहरा पाहिला तरीही त्यांना, त्याचं काहीही देणं गेणं नसतं. जे चाललंय ते निमुटपणे पाहाणं, एवढंच आपल्या हातात असतं. तो कर्णकर्कश डीजे ऐकुन अनेकांच्या हृदयाची धडधड वाढली. ट्रॅफिक जॅम झाली. गाड्यांचेही हॉर्न्स ऐकु येऊ लागले. त्याचवेळी ॲम्ब्युलन्स आली.

ट्रॅफिक जॅममध्ये अडकली. काही तरुण मुलांनी वाहतुक व्यवस्थित हाताळत ॲम्ब्युलन्सला जाण्यासाठी जागा करुन दिली. ॲम्ब्युलन्स गेली. डीजेच्या आवाज, गाड्यांचे हॉर्न्स... कलकलाटाने असह्य झालेली एक वयस्कर व्यक्ती रस्त्याच्या कडेला बसली. मनात म्हणाली, ' राजं, तुम्ही याच ह्या ठिकाणी...' आणि क्षणार्धात आसमंत उजळुन निघाला. डीजेचा आवाज आणि गाड्यांचे हॉर्न्स बंद झाले. घोड्यावर बसलेले छत्रपती शिवाजी महाराज आले. घोड्यावरुन खाली उतरताच छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी- जय शिवाजी... आसमांत घोषणा ऐकु येऊ लागल्या. प्रत्येकानं महाराजांना वाकुन मुजरा केला.

महाराजांनी विचारलं 'का जमलात इथं?' एक तरुण म्हणाला, 'महाराज, आज तुमची जयंती आहे. तीच आम्ही साजरी करतोय. ' महाराजांना आश्चर्य वाटलं. म्हणाले, 'कशा प्रकारे तुम्ही माझी जयंती साजरी करता?' त्या तरुणाने डीजे लावायला सांगितला. 'शांताबाईच्या गाण्यावर काही तरुण बेधुंद होऊन नाचु लागले. महाराजांना वाईट वाटलं. गाणं बंद झालं, नाचणं थांबलं.

तरुण म्हणाला, 'राजं, तुमची जयंती आम्ही जल्लोषात साजरी करतो.' महाराज म्हणाले, ' अति जल्लोषात माझी जयंती साजरी करत आहात तुम्ही.' त्या वयस्कर माणसाजवळ आले. त्या माणसाला, स्वतःच्या हातांच्या आधाराने उचलुन बसलवलं. म्हणाले, ' हे बाबा मनापासून म्हणाले राजं, तुम्ही याच ह्या ठिकाणी म्हणून आलोय मी. ह्या पध्दतीने तुम्ही माझी जयंती साजरी करुच नका. जे काही तुम्ही ह्याठिकाणी करत आहात ह्याचा तुम्हाला, सर्वसामान्य जनतेला काय फायदा आहे ? तुम्ही नेमकं काय करत आहात ह्याचं भान तुम्हाला आहे का ? गाण्यावर अंगविक्षेप करणाऱ्या काही तरुणांचे डोळे तारवटलेले आहेत.

एखादी गोष्ट करण्यामुळे अनेकांचं नुकसान होणार असेल तर ती गोष्ट करुच नका. तरुणांनो, तुमच्यात प्रचंड ताकद आहे, हुशारी आहे, चांगलं करण्याची धमक आहे, जिद्द आहे. ह्याप्रकारे माझी जयंती साजरी न करता समाजातील प्रत्येक घटकाला लाभ होईल अशी कामं करा. गरजुंचा आधार व्हा. तुमच्या हुशारीचा, ज्ञानाचा उपयोग इतरांचं भलं करण्यासाठी करा. ह्या कर्णकर्कश डीजेच्या आवाजाने आणि तुमच्या नाचण्याने समाजाचं काय भलं झालं ? पण हेच पैसे तुम्ही अनेकांचं भलं करण्यासाठी उपयोगात आणु शकले असतेना ?' अनेक तरुण मान खाली घालुन ऐकु लागले.

महाराज म्हणाले, ' आपली मान शरमेने खाली जाईल असं कोणतंच काम करु नका. तरुणांनो, तुमच्यातल्या ताकदीचा, ज्ञानाचा, कलेचा उपयोग राज्यासाठी, देशासाठी करा. हा महाराष्ट्र हे हिंदवी स्वराज्य तुमच्या कर्तुत्वावर प्रगती पथावर असणार आहे. वृध्दांची काळजी घ्या. त्यांना आधार द्या. ह्या पध्दतीने माझी जयंती साजरी न करता समाजाच्या हितासाठी, माता-भगिनींच्या संरक्षणासाठी जे जे करता येईल ते ते करा.' महाराज घोड्यावर बसले. तरुणांवरुन नजर फिरवली. प्रत्येकाने महाराजांना मुजरा केला. स्मित भरल्या चेहऱ्याने महाराज निघुन गेले. काही तरुणांनी डी जे वाल्याला जायला सांगितलं. त्या वयस्कर माणसाला दोघा तरुणांनी आधार देऊन घेऊन गेले. वाहतुक सुरळीत करण्यासाठी काही तरुण सहकार्य करु लागले. उर्वरित सगळे तरुण मोकळ्या मैदानावर आले. काय काय करता येईल ह्याविषयी विचार व्यक्त करु लागले.

(लेख क्र.५८९)

**- सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### आवळा

आवळा फळ गुणवत्तेबाबत सर्व फळांमध्ये श्रेष्ठ असे आहे. आवळा हे फळ निर्माण करून निसर्गाने माणसाला मोठी अनमोल देणगीच दिलेली आहे. आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभण्यासाठी आवळ्याचा आहार आणि औषधी द्रव्य म्हणून उपयोग करता येतो. आवळ्यामध्ये 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे आवळ्याच्या सेवनाने अनेक रोग बरे होतात. म्हणून आयुर्वेदामध्ये आवळ्याला अत्यंत श्रेष्ठ मानले आहे. आयुर्वेदाच्या अनेक औषधीमध्ये आवळ्याचा उपयोग करतात. मराठीत 'आवळा', हिंदीमध्ये 'आँवला', संस्कृतमध्ये 'आमलकी', इंग्रजीमध्ये 'गुसबेरी', तर शास्त्रीय भाषेत 'फिलोंथस एम्बिका' (झहूश्रश्रेपींहीी एलश्रळलर) या नावाने परिचित असलेला आवळा युफोरबीएसी या कुळातील आहे.

आवळा हा गोल, सुपारीच्या आकाराचा टणक असून, त्यावर सहा भाग करणाऱ्या उभ्या रेषा असतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



लोकशाहीर आण्णाभाऊ साठे मनपा शाळा क्रमांक २३ चे पाचवे स्नेहसंमेलन उत्साहात झाले. (छाया – अमित मन्यार)

# लहान सवंगड्यांच्या कलाविष्काराने भारावून गेलो

**नगरसेवक दत्ता गाडळकर यांचे प्रतिपादन; लोकशाहीर आण्णाभाऊ साठे मनपा शाळा क्रमांक २३ चे पाचवे स्नेहसंमेलन उत्साहात**

नगर – लोकशाहीर आण्णाभाऊ साठे मनपा शाळा क्रमांक २३ च्या पाचव्या वार्षिक स्नेहसंमेलमध्ये या चिमुकल्या बालकलाकारांनी सादर केलेली देशभक्तीपर गीते, भक्ती गीते, लावणी, स्फूर्ती गीते, एकांकिका, एकपात्री नाटके, अशा विविध चौफेर बालचमुच्या सादरीकरणातून निश्चितच समाज प्रबोधन होईल. आज खरोखर शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेल्या सादरीकरणातून मी भारावून गेलो आहे. मुलांच्या उल्लेखनीय कलाकारीन या मागच्या त्यांच्या शिक्षकांनी घेतलेली अपार मेहनत आहे. आजची मेहनत उद्याच्या भावी वाटचालीसाठी दिशादर्शक ठरेल असे प्रतिपादन नगरसेवक दत्ता गाडळकर यांनी मनपा शाळा क्रमांक २३ च्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी केले.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेची पूजन करून दिपप्रज्वलानाने करण्यात आली. यावेळी नगरसेवक सुजय मोहिते, रोटरी क्लब सेंटरचे प्रेसिडेंट सुनिल कटारिया, सचिव अमर गुरप, महिला व बालकल्याण अधिकारी भुजंग मिसाळ, ज्येष्ठ नागरिक संघाचे हबीब मन्यार सर, उद्योजक उद्धव पवार, कृष्णा लांडे, मनपा मुख्याध्यापक अरुण पवार, भाऊसाहेब कबाडी, विजय घिगे, शशिकांत वाघुलकर, अक्षय सातपुते, अनिल बडे, नवनाथ डहाळे, प्रशांत नन्नवरे, शिक्षक युवराज मोरे, रंधवे बाबा, शिक्षिका ज्योती गहिले, परदेशी मॅडम, बोलके मॅडम, दरेकर मॅडम, पालक व नागरिक उपस्थित होते.

नगरसेवक सुजय मोहिते म्हणाले की विद्यार्थ्यांना बालवयातील संस्कार, शिस्त व नियमितपणा त्यांच्या उज्वल भविष्यासाठी दिशादर्शक ठरत असतो. या शाळेतील दिवसेंदिवस होणारी प्रगती व त्यासाठी या शाळेमधील शिक्षकांची अपार मेहनत खरंच कौतुकास्पद आहे मनपाच्या माध्यमातून शाळेसाठी नक्कीच काही भरीव काम आम्ही प्रभागाचे चारही नगरसेवक भविष्यात करू असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

रोटरी क्लब सेंट्रलचे प्रेसिडेंट कटारिया यांनी सांगितले की पायाभूत शिक्षण तसेच संतुलित आहार व व्यायाम या त्रिसूत्रीय गणित जर विद्यार्थ्यांनी अंगीकारले तर भविष्यात सदृढ पिढी घडण्यास मदत होईल. आहार शिक्षण व व्यायाम असेल तरच पायाभूत शिक्षणाचा पाया भक्कमपणे रचला जाईल असे यावेळी त्यांनी सांगितले.

स्नेहसंमेलनास दीक्षित ज्वेलर्सचे संचालक सचिन दीक्षित यांनी सालाबाद प्रमाणे यावर्षी विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र भेट स्वरूपात दिले त्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. सूत्रसंचालन शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक राजळे सर यांनी केले. सहशिक्षिका शेवाळे मॅडम यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## कीर्तनरंग

“मुसाफिर” वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

संतसाहित्याच्या भव्य विश्वात ’कीर्तन’ हे सर्व रसांनी परिपूर्ण असे समृद्ध दालन आहे. कीर्तनामध्ये नृत्य आहे, नाट्य आहे. अभिनय आहे, संवाद आहे. वेदांताची मांडणी करणारे तत्त्वज्ञानाचे विवेचन आहे. संगीत आहे, विनोद आहे तसेच वक्ता आणि श्रोता यांच्यातील अहयानंदाची अनुभूतीही आहे.

कीर्तन ही निरुपणप्राधान्य आध्यात्मिक कला आहे. तत्त्वज्ञानाची किंवा जीवनमूल्यांची मांडणी करण्यासाठी सिद्धांत मांडावा. तो सिद्धान्त पटविण्यासाठी दृष्टांत द्यावा. हा दृष्टांत अनेक वेळा कीर्तनात दृष्टांतकथेच्या अंगाने दिला जातो आणि हा सिद्धांत व दृष्टांत यांच्या पुष्ट्यर्थ संत वचनाची किंवा शास्त्रीय ग्रंथाची प्रमाणे दिली जातात. ही प्रमाणे म्हणजे अभंग, ओवी, भारुड, गवळण, आर्या, दिंडी, सुभाषिते, पदे विराण्या यासारख्या संतरचना संगीताच्या अंगाने सादर करून कीर्तनात रंग भरला जातो आणि कीर्तनरंगी वक्ता, श्रोता आणि परमात्माही नाचू लागतो. संत नामदेव महाराज हे महाराष्ट्राच्या कीर्तन परंपरेचे आद्य प्रणेते तर संत जनाबाई ही नामदेव महाराजांच्या कीर्तनाची श्रवणभक्त आणि साक्षीदार. संत नामदेवांच्या रंगलेल्या कीर्तनाचे वर्णन करणारा जनाबाईंचा एक सुंदर अभंग आहे.

एकचि टाळी झाली चंद्रभागे वाळवंटी ।
माझा ज्ञानराज गोपालाते लाह्या वाटी।
नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग
जनी म्हणे ज्ञानदेवा बोला अभंग ।।

पंढरीच्या महाद्वारात आणि चंद्रभागेच्या वाळवंटात नामदेवांचे कीर्तन उभे राहिले. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी कीर्तनात अभंग गायिला आणि चाल दिली. कीर्तन रंगू लागले आहे. आणि पांडुरंगही देहभान विसरून कीर्तनात नाचू लागला.

ज्ञानेश्वर माउली हे जसे आत्मानुभवी संत–तत्त्वज्ञानी होते तसेच उत्तम गायकही होते. मग साहित्याचे, शब्दांचे, स्वरांचे सारे रंग एकवटायचे. कीर्तनाचे हे मोठेपण पाहता मोठमोठ्या प्रज्ञावंतांनाही कीर्तनाचा मोह आवरता आला नाही. पूज्य सानेगुरुजींना कारागृहात असताना कीर्तन करायचे होते पण तबला आणि पेटी वाजविणारे साथीदार न मिळाल्याने कीर्तन करता आले नाही. त्यांच्या स्मृतिदिनी विल्सन हायस्कूलच्या पटांगणात आचार्य अत्रे यांनी ’चंदनाचे हात, पायही चंदन’ या अभंगावर अतिशय रसाळ आणि आध्यात्माबरोबरच समाजजीवनाचे विचारचिंतन घडविणारे कीर्तन केले व त्या कीर्तनात अभंग गायला आणि टाळ धरायला स्वतः पु. ल. देशपांडे होते.

– किशोर गांधी

# संताजी नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी हरिभाऊ डोळसे तसेच व्हाईस चेअरमनपदी सौ. मीरा डोळसे





नगर – श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन पदी हरिभाऊ डोळसे तर व्हाईस चेअरमन पदी सौ.मीरा हरीभाऊ डोळसे यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवडीला संचालक मंडळाने एक मताने पाठींबा दिला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विशाल आळकुंठे यांनी काम पाहिले. या निवडी बद्दल चेअरमन हरीभाऊ डोळसे व व्हाईस चेअरमन सौ.मीरा डोळसे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी देविदास साळुंखे, श्रीराम हजारे, सचिन वाकचौरे, सचिन म्हस्के, सारिका म्हस्के, उमाकांत डोळसे, सुरेशराव देवकर, जब्बारभाई शेख, प्रमोद वाळके, हेमंत देवकर आदी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना चेअरमन हरीभाऊ डोळसे म्हणाले, संताजी नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभासद, हितचिंतक व ठेवीदार यांच्या विश्वासामुळेच चेअरमनपदी निवड झाली आहे. पतसंस्थेच्या प्रगतीसाठी व सभासदांच्या हितासाठी सदैव प्रयत्नशील राहू.

# केडगावच्या सरस्वती विद्या मंदिर विद्यालयातील विद्यार्थी ‘स्टुडन्ट टॅलेंट सर्च परीक्षेत’ राज्यातील ‘गुणवत्ता यादीत’

**आराध्या जाधव व ईश्वरी कोठुळे राज्यात पाचवी; तर देवांश जाधव राज्यात सहावा**

नगर – केडगाव येथील सरस्वती प्राथमिक विद्या मंदिर विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी स्टुडन्ट टॅलेंट सर्च परीक्षेत राज्यपातळीवर उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या गुणवत्तेची मोहर उमटवली आहे.

कु. आराध्या सोमनाथ जाधव व कु. ईश्वरी सागर कोठुळे या मुलींनी राज्यात पाचवा क्रमांक पटकावला आहे. त्याचप्रमाणे चि. देवांश महेश जाधव याने राज्यात सहावा क्रमांक पटकाविला. या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, शालेय व्यवस्थापन समिती, शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृंद व पालक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करुन त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



सरस्वती प्राथमिक विद्या मंदिर विद्यालयाच्या विद्यार्थिनी कु. आराध्या जाधव व कु. ईश्वरी कोठुळे यांनी स्टुडन्ट टॅलेंट सर्च परीक्षेत राज्यपातळीवर यश संपादन केल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

स्टुडन्ट टॅलेंट सर्च ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेची, अभ्यासातील सातत्याची आणि सर्वांगीण तयारीची कसोटी मानली जाते. या कठीण स्पर्धेत उज्वल यश मिळवणे हे मोठे आव्हान असते. मात्र या गुणवंत विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, नियोजनबद्ध अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मुख्याध्यापक संदीप भोर यांनी सांगितले.

# क्रीडा विकासासाठी नाविन्यपूर्ण योजना सादर कराव्यात

**डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे आवाहन; वाडिया पार्क क्रीडा संकुल विविध क्रीडा सुविधांच्या कामाचे भूमिपूजन, आधुनिक रूपांतरातून स्थानिक खेळाडूंना राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा मिळणार**

नगर – जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी वाडिया पार्क मैदानाचे अत्याधुनिक क्रीडा संकुलामध्ये रूपांतर करण्यात येत असून, या माध्यमातून स्थानिक खेळाडूंना राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. जिल्ह्यात अनेक गुणवंत खेळाडू असून त्यांच्या अनुभवाचा क्रीडा विकासासाठी उपयोग करून नावीन्यपूर्ण योजना सादर कराव्यात. क्रीडा क्षेत्रात जिल्ह्याचे नाव सर्वोच्चस्थानी राहील या दृष्टीने काम करण्याचे आवाहन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

वाडिया पार्क क्रीडा संकुल येथे १५ कोटी रुपयांच्या विविध क्रीडा सुविधांच्या कामाचे भूमिपूजन पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, डॉ.सुजय विखे पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे आदींसह नवनिर्वाचित नगरसेवक, शिव छत्रपती पुरस्कार विजेते खेळाडू आणि विविध क्रीडा स्पर्धेचे प्रशिक्षक आणि खेळाडू उपस्थित होते.



वाडिया पार्क क्रीडा संकुल येथे विविध क्रीडा सुविधांच्या कामांचे भूमिपूजन करताना पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या निर्मितीच्या कामाचा शुभारंभ होत असून हा क्षण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. जिल्ह्याने अनेक गुणवंत खेळाडू दिले असून त्यांनी उपलब्ध साधनांवर उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला आहे. या समृद्ध परंपरेला आधुनिकतेची जोड देणे ही काळाची गरज होती.

अत्याधुनिक सुविधांमुळे युवा खेळाडूंना दर्जेदार सराव करता येईल आणि मोठ्या स्पर्धांमध्ये भाग घेण्याची संधी मिळेल. क्रीडा संकुलासाठी सुमारे ५० कोटी रुपयांच्या आराखड्यास शासनाने मान्यता दिली असून पहिल्या टप्प्यातील १५ कोटी रुपयांच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला आहे. संपूर्ण काम पूर्ण झाल्यानंतर राज्यातील सर्वांत उत्कृष्ट असे क्रीडा संकुल येथे उभे राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले, केंद्र व राज्य शासन क्रीडा विकासाला प्राधान्य देत असून केंद्रीय अर्थसंकल्पात क्रीडा क्षेत्रासाठी ३ हजार १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी ९०० कोटी रुपये ‘खेलो इंडिया’ योजनेसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. जिल्हा नियोजन मंडळातून क्रीडा क्षेत्रासाठी ५० कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, सीएसआरच्या माध्यमातूनही आवश्यक निधी व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ५१ कोटी रुपयांच्या आराखड्यास शासनाची मान्यता मिळाली आहे. वाडिया पार्कच्या आधुनिकीकरणामुळे शहर व जिल्ह्यातील खेळाडूंना मोठी संधी उपलब्ध होणार आहे. केडगाव येथे ७ एकर जागेवर सर्व सुविधांनी युक्त भव्य क्रिकेट मैदान उभारण्याचा मानस असून, शासनामार्फत क्रीडा क्षेत्रात केलेली ही गुंतवणूक युवकांच्या भविष्यासाठी मोलाची ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी प्रस्तावित क्रीडा संकुलातील विविध विकासकामांची व राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवर नगरचे खेळाडू मिळवलेल्या नावलौकिकाची माहिती दिली. प्रारंभी स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास पदाधिकारी, अधिकारी, क्रीडाप्रेमी नागरिक व खेळाडू उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उध्दव काळापहाड यांनी केले. क्रीडा अधिकारी भाऊराव वीर यांनी आभार मानले.

वाडिया पार्क येथे होणाऱ्या जागतिक दर्जाच्या कामांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे.

जागतिक दर्जाचा ट्रॅक, मान्यताप्राप्त १५ मिमी जाडीचा ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅक ८ लेन सह उभारण्यात येणार आहे. क्रिकेट मैदानासाठी अत्याधुनिक खेळपट्टी, फ्रेश गार्डन सॉइल आणि फार्मयार्ड मॅन्युअर वापरून दर्जेदार लॉन विकसित केले जाईल. ऑटोमॅटिक स्प्रिंकलर सिस्टीम यामध्ये स्टेडियमच्या देखभालीसाठी २० एच. पी.च्या मोटारसह आधुनिक पॉपअप स्प्रिंकलर सिस्टीम बसवण्यात येईल. बॉल गेम डोम रूफ यामध्ये बास्केटबॉल आणि व्हॉलीबॉल मैदानावर स्ट्रक्चरल स्टील आणि कलर कोटेड शीट वापरून मजबूत ‘डोम रूफ’ उभारले जाईल. तसेच कबड्डीचे दोन व खो–खो च्या दोन मैदानांचे अद्ययावत बांधकाम करून त्यावरही डोम रूफची सोय केली जाणार आहे.

# पंन्यास प्रवर चारित्ररत्न विजयजी महाराजा साहेब यांची आनंदधाम येथे २३ ते २५ फेब्रुवारी दरम्यान प्रवचन माला



नगर – आनंदधाम जैन धार्मिक परीक्षा बोर्ड येथे तीन दिवसीय हृदय परिवर्तन प्रवचन माला आयोजित करण्यात आली आहे. २३ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत सकाळी ९ ते १० या कालावधीत पंन्यास प्रवर श्री चारित्ररत्न विजयजी महाराजा साहेब हे आपल्या ओजस्वी वाणीतून प्रवचन देणार आहेत. यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा. यांच्यासह साधू साध्वीजींची उपस्थिती असणार आहे.

२३ फेब्रुवारी जीवन एक संघर्ष, २४ फेब्रुवारी रोजी पेन्सिल की आत्मकथा, २५ फेब्रुवारी रोजी आनंद की आधारशीला या विषयावर प्रवचन होणार आहे. भाविकांनी या प्रवचनाच्या लाभ घ्यावा असे आवाहन कापड बाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा व सर्व ट्रस्टी मंडळ, तसेच धार्मिक परीक्षा बोर्ड व जैन श्रावक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सारसनगर येथे महासाध्वींचे २१ फेब्रुवारीला प्रवचन



नगर – महासती जिनशासन गौरव पूज्य महासाध्वी सुनंदाजी म.सा. यांचे सारसनगर येथे २१ फेब्रुवारी रोजी सकाळी राजवर्धन सोसायटी, गाडळकर मळा, सारसनगर येथे मंगल आगमन झाले आहे. त्यांच्या सोबत आदि ठाणा ६ देखील उपस्थित आहेत.

या पावन प्रसंगी सकाळी आगमनानंतर उपस्थित भाविकांना दर्शन व वंदनाचा लाभ घेता येत आहे. महासती जिनशासन गौरव पूज्य सुनंदाजी म.सा. यांच्या प्रेरणादायी प्रवचनांचा लाभ घेण्यासाठी तसेच धर्मलाभासाठी सर्व श्रावक–श्राविकांनी शनिवारी रात्री ९ वाजता विवांता सोसायटी राजवर्धन सोसायटी शेजारी येथे उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# श्री गुरु तेग बहादूरजी निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण

नगर – येथील श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शहिदी वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. तारकपूर येथील घर घर लंगर सेवेच्या अन्न छत्रालयात विजेत्यांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेला राज्यभरातून प्रतिसाद लाभला होता.



श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शहिदी वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. तारकपूर येथील घर घर लंगर सेवेच्या अन्न छत्रालयात विजेत्यांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या जीवनकार्यावर आधारित ही निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यांच्या अमर त्यागाची, धार्मिक स्वातंत्र्याच्या संदेशाची आणि मानवतेच्या विचारांची जाणीव समाजापर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. धर्मासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान, विविधतेतील एकता आणि गुरु तेग बहादूरजी यांचे जीवन व संदेश हे विषय स्पर्धेसाठी देण्यात आले होते.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक सुवर्णा दीपक पवार (अहिल्यानगर), द्वितीय पारितोषिक अक्षरा किशोर महाजन (वसमत, जि. हिंगोली) व दुर्गेश किशोर चिलवर (जालना), तर तृतीय पारितोषिक अजितकौर बलजीतसिंग वधवा (अहिल्यानगर) यांनी मिळविले. विजेत्यांना अनुक्रमे ₹२५०१, ₹१५०१ आणि ₹५०१ अशी रोख बक्षिसे देण्यात आली.

विजेत्या स्पर्धकांना तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या हस्ते बक्षीदे देण्यात आली. यावेळी त्यांनी ‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादूरजींप्रती आदर व्यक्त करत त्यांचे कार्य मानवतेला दिशादर्शक असल्याचे स्पष्ट केले. तर घर घर लंगर सेवा टीमच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

या उपक्रमासाठी जनक आहुजा, गुलशन कंत्रोड, प्रितपालसिंग धुप्पड, मुन्ना जग्गी, सतीश गंभीर, हरजीतसिंग वधवा, राजेंद्र कंत्रोड, प्रशांत मुनोत, राजू जग्गी, सुनील थोरात, सोमनाथ चिंतामणी, अनीश आहुजा, किशोर रंगलानी, बलजीतसिंग वधवा, दीपक पवार, सौरभ त्रिमुखे आदींनी परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे गुरु तेग बहादूरजींच्या महान त्यागाचा व मानवतेच्या संदेशाचा प्रभावी प्रसार झाला असून, वर्षभर विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती देण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत अमिता कंत्रोड व सतीश गंभीर यांनी केले. प्रास्ताविकात हरजीतसिंग वधवा यांनी या स्पर्धेची माहिती दिली. जनक आहुजा यांनी आभार मानले.

# आधुनिक किचन - स्टाईल, स्पेस आणि स्मार्टनेसचा संगम

**बदलत्या काळातील किचन**

पूर्वी किचन बंदिस्त, अंधारात आणि कमी जागेत असायचे. साठवणुकीसाठी कपाटे कमी, मांडणी साधी आणि साधनसामग्री मर्यादित असायची. परंतु आजच्या आधुनिक किचनमध्ये प्रकाश, हवा, स्वच्छता, तंत्रज्ञान आणि सौंदर्य यांचा सुंदर मिलाफ दिसतो.

आज किचन ही केवळ स्वयंपाकाची जागा नसून, ती एक लाइफस्टाइल स्पेस बनली आहे.

**मॉड्युलर किचन - एक क्रांती**

आधुनिक किचन म्हटले की सर्वात आधी आठवते ते म्हणजे मॉड्युलर किचन. रेडीमेड युनिट्स, नीट आखलेली कपाटे, ड्रॉअर्स आणि पुल-आउट ट्रॉली यामुळे किचन अधिक कार्यक्षम बनते.

**मॉड्युलर किचनचे फायदे:**

जागेचा जास्तीत जास्त वापर, स्वच्छता राखणे सोपे, वस्तू शोधायला कमी वेळ, आकर्षक आणि आधुनिक लुक

सॉफ्ट-क्लोज ड्रॉअर्स, कॉर्नर कॅरुसेल युनिट, मसाला रॅक, बाटली स्टँड अशा अनेक सुविधा आज सहज उपलब्ध आहेत.

**वर्क ट्रायंगलची संकल्पना**

आधुनिक किचन डिझाईनमध्ये वर्क ट्रायंगल ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. सिंक, गॅस स्टोव्ह आणि फ्रिज यांची योग्य त्रिकोणी मांडणी केल्यास स्वयंपाक करताना अनावश्यक हालचाल कमी होते. यामुळे वेळ आणि ऊर्जा दोन्हीची बचत होते. योग्य नियोजन हेच आधुनिक किचनचे मुख्य गमक आहे.

**आधुनिक साहित्याचा वापर**

आज किचनमध्ये वापरले जाणारे साहित्य अधिक टिकाऊ आणि आकर्षक आहे. काउंटरटॉपसाठी ग्रॅनाईट किंवा क्वार्ट्झ, वॉटरप्रूफ प्लाय किंवा HDHMR बोर्ड, ॲटक्रिलिक, लॅमिनेट किंवा झण फिनिश, हे साहित्य पाण्यापासून सुरक्षित, स्वच्छ करायला सोपे आणि दीर्घकाळ टिकणारे असते.

**प्रकाशयोजना - किचनची ओळख**

योग्य प्रकाशयोजना नसलेले किचन कितीही सुंदर असले तरी त्याची शोभा कमी होते.

**आधुनिक किचनमध्ये :**

कॅबिनेटखाली LED स्ट्रिप, पेंडंट लाईट्स, फॉल्स सिलिंगमध्ये स्पॉट लाईट्स, नैसर्गिक प्रकाशासाठी मोठी खिडकी, प्रकाशामुळे किचन अधिक मोठे, स्वच्छ आणि आकर्षक दिसते.

**रंगसंगतीचे महत्त्व**

आजकाल हलके आणि सौम्य रंगांना प्राधान्य दिले जाते. पांढरा, ग्रे, बेज, पेस्टल शेड्स यामुळे किचन खुलं आणि शांत वाटतं.

लहान जागेसाठी हलके रंग अधिक योग्य ठरतात. डार्क आणि लाइट रंगांचा समतोल साधल्यास किचन अधिक स्टायलिश दिसते.

**आधुनिक उपकरणांची साथ**

तंत्रज्ञानाने किचनमध्येही प्रवेश केला आहे.

चिमणी, इंडक्शन कुकटॉप, बिल्ट-इन ओव्हन, मायक्रोवेव्ह, डिशवॉशर या उपकरणांमुळे वेळ वाचतो आणि स्वयंपाक अधिक सोपा होतो. काम करणाऱ्या स्त्रियांसाठी तर ही मोठी मदत आहे.

**स्टोरेजचे स्मार्ट नियोजन**

आधुनिक किचनमध्ये प्रत्येक वस्तूसाठी ठरलेली जागा असते.








छतापर्यंत उंच कॅबिनेट, ड्रॉवर ऑर्गनायझर, मसाला रॅक वेगळा,

कचरापेटीसाठी इनबिल्ट युनिट

Less Clutter - More Comfort हेच आधुनिक किचनचे तत्व आहे.

**व्हेंटिलेशन आणि स्वच्छता**

किचनमध्ये योग्य हवा आणि वायुवीजन आवश्यक आहे. चांगली चिमणी आणि खिडकी असल्यास धूर व वास कमी राहतो.

भिंतींवर टाईल्स वापरल्यास स्वच्छता राखणे सोपे जाते.

**इको-फ्रेंडली किचन**

आजच्या पर्यावरणपूरक युगात इको-फ्रेंडली किचन ही काळाची गरज आहे.

LED लाईट्स, पाण्याची बचत करणारे नळ, पुनर्वापरयोग्य साहित्य

**कचऱ्याचे वेगळे वर्गीकरण**

पर्यावरणाचा विचार करून केलेले नियोजन भविष्यासाठी फायदेशीर ठरते.

**ओपन किचन - नवी ट्रेंड**

आज अनेक घरांमध्ये ओपन किचनची संकल्पना लोकप्रिय झाली आहे. हॉल आणि किचनमध्ये भिंत नसते. त्यामुळे घर अधिक मोठे आणि मोकळे वाटते.

ओपन किचनमध्ये सौंदर्य आणि स्वच्छता अधिक महत्त्वाची ठरते.

**किचन आयलंड - आधुनिक आकर्षण**

मोठ्या जागेत किचन आयलंड ठेवले जाते. त्यावर कटिंग, सर्व्हिंग किंवा ब्रेकफास्टसाठी वापर करता येतो.

हे आधुनिक किचनचे आकर्षण ठरते. सुरक्षिततेकडे लक्ष, गॅस पाइपलाइन सुरक्षित असावी, इलेक्ट्रिकल पॉइंट योग्य ठिकाणी असावेत, स्लिप-प्रूफ फ्लोअरिंग वापरावे, सौंदर्यासोबत सुरक्षितताही तितकीच महत्त्वाची आहे.

**१. ओपन आणि फंक्शनल लेआउट निवडा**

आजकाल ओपन किचनची ट्रेंड वाढली आहे. हॉल आणि किचन यामध्ये दृश्यात्मक सुसंगती असावी.

वर्क ट्रायंगल (सिंक-स्टोव्ह-फ्रिज) योग्य अंतरावर ठेवणे खूप महत्वाचे.

**२. मॉड्युलर कॅबिनेट्सचा वापर**

मॉड्युलर किचनमुळे जागेचा योग्य वापर होतो. सॉफ्ट-क्लोज ड्रॉअर्स, पुल-आउट ट्रॉली, कॉर्नर कॅरुसेल युनिट, यामुळे काम सोपे आणि नीटनेटके होते.

**३. योग्य लाइटिंग डिझाइन**

फक्त एक ट्यूबलाईट पुरेशी नसते, कॅबिनेटखाली LED स्ट्रिप

पेंडंट लाईट्स (ब्रेकफास्ट काउंटरसाठी), नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर, लाइटिंगमुळे किचन अधिक आकर्षक दिसते.

**४. टिकाऊ आणि सोपे मटेरियल**

काउंटरटॉपसाठी ग्रॅनाईट किंवा क्वार्ट्झ उत्तम, कॅबिनेटसाठी वॉटरप्रूफ प्लाय किंवा HDHMR बोर्ड वापरणे फायदेशीर.

**५. स्मार्ट स्टोरेज सोल्यूशन्स**

उंच कॅबिनेट्स (छतापर्यंत), मसाला रॅक वेगळा, ड्रॉवर ऑर्गनायझर, Less Clutter - More Comfort हे तत्व वापरा.

**६. आधुनिक उपकरणांचा वापर**

चिमणी, बिल्ट-इन ओव्हन, इंडक्शन कुकटॉप यामुळे स्वयंपाक सोपा आणि स्वच्छ राहतो.

**७. रंगसंगती साधी ठेवा**

व्हाइट, ग्रे, बेज, पेस्टल शेड्स सध्या ट्रेंडमध्ये आहेत.

हलके रंग किचन मोठे आणि स्वच्छ दिसायला मदत करतात.

**८. व्हेंटिलेशन विसरू नका**

चांगली चिमणी आणि खिडकी असल्यास उष्णता व वास कमी राहतो.

**९. इको-फ्रेंडली पर्याय वापरा**

LED लाईट्स, पाण्याची बचत करणारे टॅप, पुनर्वापरयोग्य मटेरियल

**Reflection Interiors**
**Pravin Kisanrao Padwal.**
**padwalpravin339@gmail.com**
**Cell : 9309083815.**
**Vipasha Apartment,**
**A-4, Sawedi, Ahilyanager.**
**Bhaghyshri society c-3,**
**Raikernager, Dhayri,**
**Sinhagad road , Pune 41.**

**Architects, Engineers & Surveyor Association Ahilyanagar**



---

## नगरमध्ये २३ फेब्रुवारीपासून ४ दिवसीय मोफत झुंबा अ‍ॅण्ड बॉलिवूड डान्स फिटनेस वर्कआऊट कार्यशाळेचे आयोजन

नगर - सावेडी येथील के. पी. लॉन जवळील पंपीग स्टेशन रोड वरील क्रोनोज फिटनेस येथे सुमीत फिटनेस अ‍ॅण्ड बॉलरुम डान्स स्टुडीओ अ‍ॅण्ड क्रुनोझ फिटनेसच्यावतीने चार दिवसीय मोफत झुम्बा आणि बॉलीवुड डान्स फिटनेस वर्कआऊटची २३ फेब्रुवारी रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या कार्यशाळेमध्ये विविध प्रकारचे डान्स आणि फिटनेसचे प्रकार शिकविले जाणार आहे. जसे की, साल्सा, कोंबीया, बचाटा, हिंदी आणि मराठी बॉलीवुड गाण्यावर फिटनेस प्रकार शिकविण्यात येणार आहे. या फिटनेस प्रकार शिकविण्यासाठी सेलीब्रेटी मास्टर ट्रेनर सुमीत गोहेर मार्गदर्शन करणार आहेत. शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी ९०११५३३०६९, ८४०८९३३९३३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## मुळा डाव्या व उजव्या कालव्यांचे २३ फेब्रुवारीपासून आवर्तन

नगर - मुळा लाभक्षेत्रातील उजव्या व डाव्या कालव्यावरील शेतकऱ्यांची पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन, रब्बी हंगाम-२ साठी २३ फेब्रुवारीपासून आवर्तन सुरू करण्याच्या सूचना जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या आहेत.

सध्या उन्हाची तीव्रता वाढली असून, लाभक्षेत्रात पाण्याची पातळी खूपच खालावल्यामुळे शेतकऱ्यांकडून पाणी सोडण्याची मोठी मागणी होत होती. या संदर्भात आ. मोनिकाताई राजळे व आ. विठ्ठलराव लंघे यांनी जलसंपदा मंत्री विखे पाटील यांची भेट घेऊन, रब्बी पिकांची व पिण्याच्या पाण्याची आवश्यकता लक्षात घेत आवर्तन सुरू करण्याची विनंती केली होती. यावर तातडीने कार्यवाही करत, पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी धरणातील पाण्याचा उपलब्ध साठा तसेच भविष्यातील पाण्याचे नियोजन विचारात घेऊन आवर्तनाचा कालावधी निश्चित करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत.

या निर्णयाचा उजव्या कालव्यावरील राहुरी, नेवासा, शेवगाव आणि पाथर्डी या तालुक्यांतील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. सदर आवर्तन ४५ दिवसांचे असणार असून, त्यासाठी धरणातील ५ टीएमसी इतका पाणीसाठा राखीव ठेवण्यात आला आहे. या आवर्तनाचा लाभ अंदाजे २७ हजार हेक्टर क्षेत्राला होईल. तसेच, मुळा डाव्या कालव्यासाठी ४५० एमसीएफटी इतका पाणीसाठा राखीव असून हे आवर्तन २१ दिवस चालणार आहे. याचा फायदा अंदाजे २५०० हेक्टर इतक्या क्षेत्राला होईल. आवर्तनाच्या कालावधीत पाण्याचा अजिबात अपव्यय होणार नाही याची दक्षता घेण्याचे, तसेच शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचेल असे अचूक नियोजन करण्याचे काटेकोर निर्देश मंत्री पालकमंत्री श्री.विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

---




हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अमेरिकेतील टेनेसी राज्यात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती फाउंडेशन अमेरिका - टेनेसी राज्य यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला महाराष्ट्र व गुजरात येथील बांधव उपस्थित होते.

## अमेरिकेत दिमाखात शिवजयंती उत्साहात साजरी

नगर - हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अमेरिकेतील टेनेसी राज्यात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती फाउंडेशन अमेरिका - टेनेसी राज्य यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला महाराष्ट्र व गुजरात येथील बांधव उपस्थित होते. 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अजय देशमुख यांनी केले. यावेळी जिगर शर्मा, विपुल तसेच पटेल समाजातील शिवभक्त उपस्थित होते.

परदेशात वास्तव्यास असतानाही भारतीय संस्कृती, इतिहास आणि परंपरेचे जतन करण्याचा संदेश या शिवजयंती उत्सवातून देण्यात आला. शिवचरित्रावर आधारित मनोगते, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजएकात्मतेचे दर्शन घडवणारे उपक्रम यामुळे उत्सवाला विशेष रंगत आली. उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा गौरव करत स्वराज्याची प्रेरणा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला.

शिवजयंतीच्या पवित्र दिवशीच छत्रपती फाउंडेशन अमेरिका व्यवसाय समूह यांच्या हस्ते आमराई भारतीय स्वयंपाकगृह व उपाहारगृह या उपाहारगृहाच्या दुसऱ्या शाखेचे उद्घाटन करण्यात आले. हा क्षण केवळ व्यवसाय विस्ताराचा नसून एका जिद्दी मराठी तरुणाच्या स्वप्नपूर्तीचा आनंददायी क्षण ठरला. जॅक्सन शहरात सुरू झालेल्या या उपाहारगृहामुळे स्थानिक भारतीय समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील साध्या कुटुंबातून पुढे आलेल्या अक्षय वाघचौरे यांनी अवघ्या पंचविशीमध्ये अमेरिकेत स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. बारावीनंतर त्यांनी पुणे व्यवस्थापन संस्था येथून हॉटेल व्यवस्थापनाची पदवी प्राप्त केली. त्यानंतर जे. डब्ल्यू. मॅरियट, पुणे येथे प्रशिक्षणार्थी म्हणून काम करत त्यांनी व्यावसायिक जीवनाची पायाभरणी केली.

मोठी स्वप्ने साकार करण्यासाठी सन २०२४ मध्ये अक्षय अमेरिकेत गेले. विस्कॉन्सिन राज्यातील ओनायडा हॉटेल व कॅसिनो येथे प्रशिक्षण पूर्ण करताना त्यांनी नव्या देशातील संस्कृती, कामाची शिस्त आणि विविध आव्हानांना सामोरे जात अनुभव संपादन केला. त्यानंतर रोडवे इन येथे वर्षभर प्रामाणिक सेवा देत त्यांनी उद्योग क्षेत्रातील अनुभव अधिक दृढ केला.

अक्षय यांचे ध्येय केवळ नोकरीपुरते मर्यादित नव्हते. स्वतःचे उपाहारगृह सुरू करून लोकांना प्रेमाने अन्न वाढण्याचे त्यांचे स्वप्न होते. स्वप्निल खेडेकर व विशाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंतीच्या पावन दिनी 'आमराई भारतीय स्वयंपाकगृह व उपाहारगृह'ची दुसरी शाखा सुरू करत त्यांनी हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले. या यशस्वी वाटचालीत श्रेयस नाईकवडी, श्रीकांत जाधव, सागर शिगाडे, अजय देशमुख, मनीष चव्हाण आणि रॉयस्टन डिसिल्वा यांचा मोलाचा पाठिंबा लाभला.

सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे अक्षय वाघचौरे छत्रपती फाउंडेशन अमेरिका यांच्याशी सक्रियपणे जोडले गेले असून शिवजयंतीसारख्या सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांत ते नेहमीच सहभाग घेत आहेत. अमेरिकेत दिमाखात साजऱ्या झालेल्या या शिवजयंती उत्सवामुळे परदेशातील मराठी बांधवांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून स्वराज्याच्या विचारांची ज्योत जागतिक स्तरावर उजळून निघावी, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. अक्षय वाघचौरे यांची ही यशोगाथा आज प्रत्येक मराठी तरुणासाठी प्रेरणास्थान ठरत आहे.

## ईटन कंपनीमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी



एमआयडीसी मधील ईटन इंडस्ट्रियल सिस्टीम प्रा. ली. कंपनीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

नगर - अहिल्यानगर एमआयडीसीमधील ईटन इंडस्ट्रियल सिस्टीम प्रा. ली. कंपनीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या शिवजयंतीच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष लांडे, किरण दाभाडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे तसेच कंपनीच्या व्यवस्थापनातील श्रीमती अंकिता खानविलकर, मंगेश चौधरी, सुशील खिलारी, प्रदीप कोंडे, चैतन्य जामगावकर, देवेंद्र चौधरी, तसेच कामगार प्रतिनिधी, महिला कामगार या सर्वांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिवाजी महाराजांची आरती घेण्यात आली.

शिवजयंती निमित्त कामगारांच्या पाल्यांसाठी विविध सादरीकरणासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले होते. चि.लेवीश देसले, कौस्तुभ गावडे कु.अनिशा सोनवने या विद्यार्थी पाल्यांने शिवजयंतीपर भाषण केले. तसेच चि.अंशुमन आटोळे, अविश्कार शुक्ल, व सम्यक आढागळे या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेगवेगळ्या मोहीमेच्या प्रसंगावर पोवाडे गायले. तसेच कु. ईश्वरी कवडे या विद्यार्थीनीने एक सुंदर गीत गायले.

आज सुमारे साडेतीनशे वर्षानंतरही छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेले विचार जिवनातील प्रत्येक टप्प्यावर उपयुक्त ठरत आहेत. त्यांनी घालून दिलेले प्रशासकीय कौशल्य, सैनिकी कारवाया, त्यांनी देशाला दिलेले पहीले आरमार हे आजही आपल्याला मार्ग दाखवते. असे मत कंपनीचे क्वालिटी हेड मंगेश चौधरी यांनी व्यक्त केले.

कामगार संघटनेचे पदाधिकारी किरण दाभाडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, छत्रपती शिवराय जर नसते, तर या देशाचा इतिहास आणि भूगोल हा वेगळा असता. तुम्ही आम्ही आज ज्या परिस्थितीत आहोत या परिस्थितीत आज आपण नसतो. महात्मा फुले यांनी छत्रपती शिवरायांची समाधी शोधून काढली व पहिली शिवजयंती फुलेंनी साजरी केली. तसेच महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर पहिला पोवाडा रचला. त्यामुळेच आज महाराजांच्या जयंतीची परंपरा सुरू आहे. तसेच श्री.दाभाडे पुढे बोलताना म्हणाले की, छत्रपतींच्या राज्यात जातीभेद नव्हता. आणि त्यांचाच वसा घेऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनीही पुढे समतेचा संदेश विखुरलेल्या समाजाला दिला.

कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष लांडे यांनी शेवटी आपले विचार मांडले. त्यांनी आपले विचार मांडताना सांगितले, की छत्रपती शिवाजी महाराजांना आज आपण जे पूजतो, वंदन करतो, तेव्हा त्यांचे आचरण त्यांचे वागणे आपल्या स्वतः मध्ये कसे आचरणात आणता येईल याचा आपण प्रयत्न केला पाहीजे. शिवाजी महाराजांचा किमान एकतरी गूण आपण अंगिकारला पाहीजे असे त्यांनी सांगितले.

शिवजयंतीचा सर्व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी कामगार प्रतिनिधी गौतम मेटे, वैभव पादीर, प्रशांत शिंदे, नवनाथ वडघुले, वैभव तोडमल, किरण जपे, प्रफुल्ल गरूड व कंपनी व्यवस्थापन यांनी परीश्रम घेतले.

सूत्रसंचालन ज्ञानेश्वर कवडे यांनी केले. तसेच या शिवजयंतीनिमित्त कंपनीने कामगारांना गोड सात्विक जेवन दिले.

---



### केडगावच्या शाहूनगरमध्ये बालचिमुकल्यांची शिवजयंतीनिमित्त सायकल रॅली

केडगाव येथील शाहूनगर परिसरात बालचिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त सायकलवरून मिरवणूक काढली. या चिमुकल्यांच्या मिरवणुकीने काढून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. शिवरायांप्रती आदर, संस्कार आणि इतिहासाची जाणीव निर्माण करुन देण्यासाठी ही मिरवणूक महत्त्वाची ठरली. बालगोपालांनी दिलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणांनी परिसर दुमदुमला.

## श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत घुमला 'जय भवानी, जय शिवाजी'चा निनाद




नगर - बालशिवाजी , छोटे, छोटे मावळे, मासाहेब जिजाऊ यांच्या वेशभूषेत चमकणारे विद्यार्थी, शिवमय वातावरण, छोट्या हातांनी रेखाटून फलकलेखनात दिमाखात झळकणारे छत्रपती शिवाजी महाराज हे चित्र होते सावेडीतील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला येथील आणि निमित्त होते छत्रपती शिवाजी महाराज जयंती.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथीपद नगरसेविका श्रीमती सुनीता कुलकर्णी व त्यांचे चिरंजीव पुष्कर कुलकर्णी यांनी तर अध्यक्षपद समर्थ प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी तथा शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर यांनी भूषविले. प्रशालेच्या माध्यमिक विभाग प्राचार्या सौ. वसुधा जोशी, पर्यवेक्षक कुलकर्णी सर व प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर यांच्या उपस्थितीने सोहळा अधिकच रंगला.

कार्यक्रमाची सुरुवात शिवआरती व संगीत शिक्षिका सौ. खणकर यांच्या शिवगीताने झाली.

आजचा दिवस हा प्रत्येक मराठी मनात राष्ट्रप्रेम जागृत करणारा आहे. आजच्या मोबाईलच्या डिजिटल अशा स्पर्धात्मक युगात प्रत्येक विद्यार्थ्याने महाराजांचे संघटनकौशल्य, निर्णयक्षमता असे असंख्य गुण घेण्यासारखे आहेत असे विचार सौ. धनश्री गुंफेकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून मांडले.

विविध वेशभूषेत आलेल्या श्रेयस बामदळे, छोटा आदेश जाधव, काव्या भालेराव, ओंकार देशमुख, अवनी म्हस्के या सर्व विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ललकारी, पोवाडा व भाषणे याने संपूर्ण वातावरण शिवमय झाले.

कार्यक्रम अध्यक्ष सुरेश क्षीरसागर यांनी यानिमित्ताने पालकांना शिवरायांचा इतिहास मुलांना वाचनासाठी उपलब्ध करून द्यावा, महाराजांचे विचार आपल्या आचरणात उतरविले तर ती खरी शिवजयंती ठरेल असे प्रतिपादन केले.

जेष्ठ शिक्षिका सौ. बोठे व सौ. गीतांजली शेरकर यांनीदेखील यानिमित्ताने आपले मनोगत मांडले.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी श्रीमती सुनीता कुलकर्णी यांनी शिवजयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. परिचय सौ. वृषाली कुलकर्णी यांनी केले. गणेश पारध्ये यांनी आभार मानले. सूत्रसंचालन सौ. प्राची देशमुख यांनी केले.




# टाळा 'क' जीवनसत्वाचा अतिरेक

व्याधी विचार

रोगप्रतिकारक्षमता वाढवण्यासाठी 'क' जीवनसत्त्वाचं सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. यासाठी अनेक लोक नियमितपणे 'क' जीवनसत्त्वाच्या गोळ्या घेत असतात. मात्र या जीवनसत्त्वाचा अतिरेक किंवा अतिप्रमाण घातक ठरू शकतं.

विविध संशोधनांनुसार माणसाला दररोज ६५ ते ९० मिलीग्रॅम 'क'




जीवनसत्त्वाची आवश्यकता असते. 'क' जीवनसत्त्व सेवनाची कमाल मर्यादा २००० मिलिग्रॅम इतकी आहे. सर्वसाधारणपणे एका संत्र्यातून ५१ मिलीग्रॅम 'क' जीवनसत्त्व मिळतं. म्हणजे दिवसाला दोन संत्री खाणं पुरेसं ठरतं.

शरीरात 'क' जीवनसत्त्वाचं प्रमाण वाढल्यास जुलाब, उलट्या, छातीत जळजळ, मळमळणं, पोटात गोळे येणं, निद्रानाश अशी लक्षणं दिसून येतात. म्हणूनच नैसर्गिक आहारातूनच हे जीवनसत्त्व मिळवण्याचा प्रयत्न करावा. 'क' जीवनसत्त्वयुक्त गोळ्या डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घ्याव्या.

# विशीतील तरुणींनाही वंध्यत्वाची समस्या

**वंध्यत्वाची समस्या आता केवळ तिशी-चाळीशीपुरती मर्यादित राहिलेली नाही. सध्या विशीतल्या तरुण-तरुणींनादेखील गर्भधारणेसंबंधित समस्यांना सामोरे जावे लागते. यासाठी विलंब न करता वंधत्व निवारणतज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य ठरते. गर्भधारणेसाठी मदत करणाऱ्या आधुनिक सहाय्यक प्रजनन उपचार पद्धतींची माहिती घेणेही तितकेच गरजेचे आहे.**

व्याधी विचार

सध्या, विशीतील पुरुष आणि स्त्रिया प्रजननक्षमतेच्या आव्हानांना सामोरे जात आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत प्रजनन क्षमतेच्या समस्या बहुतेकदा वाढत्या वयाशी संबंधित होत्या; मात्र आता डॉक्टर २३ ते २९ वयोगटातील अनेक स्त्रियांना गर्भधारणेसाठी संघर्ष करताना पाहत आहेत आणि ही अतिशय चिंताजनक बाब ठरत आहे. स्त्रियांमध्ये, पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम (पीसीओएस), अनियमित मासिक पाळी, ओव्ह्युलेशनच्या समस्या, थायरॉईड विकार, एंडोमेट्रिओसिस, ओटीपोटाचे संक्रमण आणि अंड्यांची खराब गुणवत्ता यांसारख्या सामान्य समस्या दिसून येतात. पुरुषांमध्ये, शुक्राणूंची संख्या कमी होणे, शुक्राणूंचे वहन योग्यरित्या न होणे, हार्मोनल असंतुलन, लठ्ठपणा, धूम्रपान, मद्यपान आणि जास्त वेळ बसल्यामुळे किंवा लॅपटॉपच्या वापरामुळे होणारा उष्णतेशी संपर्क यांसारख्या समस्या मानसिक शांतता हिरावून घेऊ शकतात. या समस्यांसाठी वंध्यत्व निवारण तज्ज्ञांची मदत घेणे गरजेचे आहे.

आहाराच्या चुकीच्या सवयी, शारीरिक हालचालींचा अभाव, वाढता ताणतणाव, अनियमित झोप, वाढता स्क्रीन टाईम, धूम्रपान, मद्यपान, प्रदूषण आणि हार्मोनल समस्यांचे उशिराने होणारे निदान ही यामागची मुख्य कारणे आहेत. तरुण, प्रौढांमध्ये वाढती लठ्ठपणाची प्रकरणे आणि इन्सुलिन प्रतिरोधकता हेदेखील प्रजननक्षमतेसंबंधीत समस्यांना कारणीभूत ठरू शकते. काही प्रकरणांमध्ये वेळीच उपचार न केल्यास संक्रमण किंवा अनुवांशिक घटकदेखील एखाद्याच्या प्रजननक्षमतेवर परिणाम करू शकतात.




अनियमित किंवा नादायक मासिक पाळी, मुरुम आणि चेहऱ्यावर अवांछित केस, वजन अचानक घटणे किंवा वाढणे, थकवा, लैंगिक इच्छा कमी होणे, लैंगिक समस्या किंवा एक वर्ष प्रयत्न करूनही गर्भधारणा न होणे ही धोक्याची लक्षणे आहेत. बरेच लोक या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात.

विशीत प्रजनन समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास हार्मोनल असंतुलनची समस्या उद्भवू शकते. स्त्रीबीज किंवा शुक्राणूंची गुणवत्ता खराब होऊ शकते. भावनिकदृष्ट्या ताण येऊ शकतो आणि उपचार अधिक गुंतागुंतीचे होऊ शकतात. त्यामुळे, प्रजनन आरोग्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

ओव्ह्युलेशन इंडक्शन, इंट्रा-युटेरिन इन्सेमिनेशन (आययूआय), इन विट्रो फर्टिलायझेशन (आयव्हीएफ) आणि प्रजनन क्षमता जतन करणे यांसारखे सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (एआरटी) तरुण रुग्णांसाठी अत्यंत प्रभावी ठरू शकतात. याचे कारण असे, की विशीत स्त्रीबीज आणि शुक्राणूंची गुणवत्ता चांगली असते आणि उपचारांचे यश दरदेखील जास्त असतात. एआरटी हे पीसीओएस, फॅलोपियन ट्यूब्ज बंद होणे, पुरुषांमधील गंभीर वंध्यत्व किंवा अज्ञात कारणांमुळे होणारे वंध्यत्व यांसारख्या समस्या असलेल्या महिलांना उपचारात मदत करतात. 'एग्ज फ्रिझिंग' हा आणखी एक प्रभावी पर्याय आहे, जो महिलांना भविष्यातील वापरासाठी त्यांच्या अंडपेशी सुरक्षित ठेवण्याची संधी देतो. कारण वयानुसार, विशेषतः पस्तीशीनंतर स्त्रीबीजांची गुणवत्ता आणि संख्या कमी होते. याचा उपयोग कर्करोगावरील उपचार किंवा एंडोमेट्रिओसिससारख्या वैद्यकीय कारणांसाठी, तसेच करिअरमुळे गर्भधारणा लांबविणे किंवा उशिराने होणारे लग्न यांसारख्या सामाजिक कारणांसाठी केला जाऊ शकतो.

## डोळ्यांचं आरोग्य


दिलासादायक शोध



'यूव्हिअल मेलानोमा' म्हणजे डोळ्यांचा कॅन्सर. एका वनस्पतीपासून तयार केलेल्या औषधामुळे याचा प्रादुर्भाव रोखणं शक्य होणार आहे. या औषधाच्या चाचणीतून खूप चांगला निकाल समोर आला आल्यामुळे येत्या काळात डोळ्यांच्या कॅन्सरला प्रतिबंध करण्यासाठी हे औषध उपयुक्त ठरेल असा विश्वास शास्त्रज्ञांना वाटतो. हा शोध दिलासा देणारा आहे.

## नैसर्गिक रंगाने काळे करा केस!

नवसंशोधन



केस पांढरे होणं ही सर्वसाधारण समस्या आहे. ठराविक वयानंतर केस पांढरे होतात. मात्र प्रदूषण, पोषक घटकांचा अभाव अशा कारणांमुळे कमी वयातच केस पांढरे होण्याच्या समस्येने अनेक जण ग्रासलेले असतात. पांढऱ्या केसांना हेअर डाय लावला जातो. मात्र त्यातल्या रसायनांमुळे केसांच्या तक्रारी अधिकच वाढतात. मात्र पांढऱ्या केसांमुळे वैतागेल्या लोकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. पंजाब विद्यापीठातल्या संशोधकांनी नैसर्गिक घटकांनी युक्त हेअर कलर तयार केला आहे. हा रंग तयार करण्यासाठी १०० टक्के नैसर्गिक घटकांचा वापर करण्यात आल्याचा शास्त्रज्ञांचा दावा आहे. मातीतल्या एका जीवाणूपासून हा रंग तयार करण्यात आला असून त्याचे दुष्परिणाम दिसलेले नाहीत.

## ...म्हणून पडतात पांढरे डाग

दंतारोग्य



मोत्यासारखे पांढरेशुभ्र दात कोणाला नको असतात? पण आपल्या चुकांमुळे त्यांचं आरोग्य धोक्यात येतं. दात पिवळे पडू लागतात. बरेचदा दातांवर पांढरे डाग पडतात. हे डाग नेहमीच्या पांढऱ्या दातांपेक्षा वेगळे असतात. मुळात ही एक समस्या आहे. 'डेंटल फ्लुरोसिस'मुळे असं होतं. आयुष्यातल्या पहिल्या आठ वर्षांच्या काळात दातांचा फ्लोराइड्सशी अधिक संपर्क आला असेल तर ही समस्या उद्‌भवते. यामुळे तुमच्या दातांचा रंग उडतो. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही समस्या दंततज्ज्ञाच्या लक्षात येते. त्यामुळे दातांची नियमित तपासणी करून घ्यायला हवी. फ्लोराईड सप्लिमेंट्सच्या सेवनामुळे ही समस्या निर्माण होते. चहा, जिलेटिन, मीठ हे फ्लोराईडयुक्त घटक आहेत. चरबीयुक्त पदार्थांच्या सेवनामुळेही असं होतं.

## राखा फुफ्फुसाचं आरोग्य

आजीबाईंचा बटवा



कोरोनामुळे फुफ्फुसाच्या आरोग्याला खूप महत्त्व आलं आहे. यासाठी नैसर्गिक घटक उपयुक्त ठरू शकतात. लसणामुळे फुफ्फुसाचा दाह कमी होऊ शकतो. फुफ्फुसाच्या कॅन्सरचा धोका कमी करण्यासाठीही लसणाचा नियमित वापर करायला हवा. अस्थम्यावरही लसूण गुणकारी आहे. सफरचंदामुळे श्वसनसंस्था उत्तम राहते. नियमित सफरचंद खाल्लं तर फुफ्फुसाला बळकटी मिळते. विविध विकार दूर ठेवायचे तर सफरचंदाचं नियमित सेवन करायला हवं. आल्यातले नैसर्गिक गुणधर्म फुफ्फुस स्वच्छ करतात. आहारात विविध प्रकारे आल्याचा समावेश करता येईल. ग्रीन टी आणि डाळीही फुफ्फुसाचं आरोग्य राखायला मदत करतात.

# 'जंक फूड' आणते अकाली वृद्धत्व

जाणून घ्या

आज आधुनिक जीवनशैलीत फास्ट फूड हा तरुणांसाठी अविभाज्य भाग होत आहे; परंतु त्यामुळे होणाऱ्या गंभीर आरोग्य धोक्यांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. नियमितपणे जंक फूडचे सेवन केल्याने त्याचा त्वचेवर, केसांवर एकंदरित आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. तारुण्यातच वृद्धत्वाच्या दिशेने वाटचाल सुरू होते.

सध्या अनेक जण जंक फूडच्या आहारी गेले आहेत. 'नॅशनल फूड अँड टेस्टिंग' एजन्सीनुसार, २०१९ मध्ये फास्ट फूड खाणाऱ्यांची संख्या २५ टक्क्यांपर्यंत होती. तीच टक्केवारी २०२३ मध्ये ४० टक्क्यांपर्यंत वाढली; मात्र २०२६ मध्ये यात सरासरी दुप्पट वाढ झाली असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. 'आयसीएमआर' अहवालात आरोग्यतज्ज्ञांनी केलेल्या दाव्यानुसार जंक फूडचा आरोग्यावर वाईट परिणाम होतो. यामुळे त्वचेवर थेट परिणाम होऊ शकतो.

'सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट'च्या चाचणी प्रयोगशाळेत केलेल्या संशोधनानुसार, भारतात पॅकज केलेल्या खाद्यपदार्थांमध्ये चरबी, तेल आणि मीठाचे प्रमाण 'एफएसएसआय'च्या मानकांपेक्षा जास्त आहे. यासोबतच चिप्स, स्नॅक्स, बर्गर, स्प्रिंग रोल यांसारख्या पदार्थांमध्ये तेलाचे प्रमाण जास्त असल्याकारणाने अनेक नवीन आजारांचा सामना करावा लागत आहे.



जंक फूडमध्ये कार्बोहायड्रेट्स असतात आणि त्यामध्ये फायबरचे प्रमाण नगण्य असते. अशा स्थितीत रक्ताभिसरणात कार्बोहायड्रेट्स ग्लुकोजच्या स्वरूपात बाहेर पडतात व परिणामी रक्तातील साखर वाढण्याची शक्यता असते. तसेच इन्सुलिन वाढते आणि त्यामुळे हृदयाचे आरोग्यही बिघडू शकते. त्यासोबतच मीठ आणि चरबीचे प्रमाण जास्त असल्याने कॅलरीज वाढतात. या पदार्थांमध्ये पौष्टिकतेची पातळी शून्य असली, तरी असे पदार्थ चवदार असल्याने त्याची मागणी वाढत आहे. नियमितपणे जंक फूड खाल्ल्याने लठ्ठपणा, हृदयरोग, मधुमेह आणि पचनाच्या समस्या उद्भवतात. त्यामुळे कोलेस्टेरॉल आणि रक्तदाब वाढतो. एका अभ्यासानुसार जंक फूडमुळे मुलांमध्ये एकाग्रता कमी होते आणि शैक्षणिक कामगिरी कमी होते. त्यामुळे मूड स्विंग आणि थकवादेखील वाढू शकतो.

# जेवताना घाम येतोय?

आरोग्यचर्चा

काहींना जेवताना घाम येतो. लोक असे मानतात, की हे गरम अन्नामुळे होते. तथापि, साधी डाळ-रोटी खातानाही लोकांना घाम येतो. काहींना थंड हवामानात जेवतानाही घाम येतो. प्रश्न असा आहे, की असे का होते.

जेवताना घाम येणे याला वैद्यकीय भाषेत 'गस्टेटरी स्वेटिंग' म्हणतात. जास्त मसालेदार अन्न खाल्ल्यावर असे होते. हे गरम शरीराच्या लोकांमध्ये दिसून येते. जेवताना घाम येणे काही लोकांसाठी सामान्य आहे; परंतु ते इतरांसाठी विविध आजारांचे लक्षण असू शकते. घाम येणे हे मधुमेहाचे




प्रारंभिक लक्षण असू शकते. एखाद्याला बराच काळ मधुमेह असेल तर त्यामुळे मज्जातंतूंना नुकसान होऊ शकते. त्यामुळे जेवताना घाम येतो. बऱ्याच लोकांना थायरॉईड आणि हार्मोनल बदलांदरम्यान देखील असे होऊ शकते. ही समस्या मुलांमध्येदेखील दिसून येते.

जेवताना घाम येणे मुलांमध्येदेखील दिसून येते. एखादे मूल मसालेदार अन्न खाते तेव्हा ते पचवण्यासाठी शरीराचे तापमान वाढते. त्यामुळे घाम येतो. तथापि, सामान्य आहार घेऊनही घाम येत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. काहीही खाताना घाम येत असेल आणि वजन झपाट्याने कमी होत असेल तसेच जेवताना हृदयाचे ठोके वाढले असेल, तर खूप मसालेदार पदार्थ खाणे टाळा थोडे आणि हलके जेवण खा. मानसिक ताण टाळा. दिवसातून किमान सात ग्लास पाणी प्या.

# फायदे बेंबीलगत या मसाजचे

आयुर्वेद आणि विकार

शरीर आणि केसांना तेलाने मसाज करण्याचे अनेक लाभ आहेत. दिवाळीत अंगाला सुंगधी तेलाने मसाज करून मग आंघोळ केली जाते. याला अभ्यांग स्नान असतं म्हणतात. या अभ्यांगाचं आयुर्वेदात खूप महत्त्व आहे. त्यातही बेंबीलगत मसाज केल्याने आपलं आरोग्य उत्तम राहायला मदत होते. या क्रियेने नेमकं काय साधलं जातं? पाहू या.



* बेंबीलगत बरीच घाण आणि जंतू जमा होतात. या भागाच्या नियमित स्वच्छतेमुळे पोटाचे विकार उद्‌भवत नाहीत.

* बेंबीच्या अस्वच्छतेमुळे आतून आणि बाहेरून जंतूसंसर्ग होऊ शकतो. तेल हा जंतू नष्ट करण्याचा नैसर्गिक उपाय आहे. यासोबतच कोणत्याही जंतूसंसर्गावर तेल प्रभावी ठरतं. मोहरी किंवा टी ट्रीच्या तेलामुळे जंतू नष्ट होतातच शिवाय त्यांच्यापासून बचावही होतो.

* बेंबीकडे आपण संपूर्ण दुर्लक्ष करतो. पण तो शरीराचा अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. बेंबी शरीरातल्या विविध नसांशी जोडलेली असल्याने या भागावर तेलाने मसाज केल्यास विविध विकारांना अटकाव होऊ शकतो.

* पोटदुखी, पोट फुगणं, मळमळण्यासारख्या समस्या असल्यास मोहरीचं तेल आणि आल्याचा रस यांच्या मिश्रणाने बेंबीलगत मसाज करा. यामुळे पचनाशी संबंधित समस्या दूर होतात.

# अशी पेयं ठरतात घातक

आपण कुठे चुकतो?

आपण विविध प्रकारची पेयं, पदार्थ बाजारातून आणतो. त्यांच्या पाकिटावर वापरण्याचा कालवधी दिलेला असतो. विशिष्ट तारीख उलटून गेल्यानंतर काही पेयं किंवा पदार्थ प्यायचे तसंच खायचे नसतात. त्यातही कालावधी उलटून गेल्यानंतर काही पेयं पिणं आरोग्यासाठी हानीकारक ठरू शकतं. म्हणूनच पेयं पिताना कोणती काळजी घ्यायला हवी हे जाणून घेऊ या.

* डॉक्टर सर्वसाधारणपणे उकळलेलं, निर्जंतुक केलेलं दूध वापरण्याचा सल्ला देतात. साधं, कोणतीही प्रक्रिया न केलेलं दूध वापरत असाल तर ते वेळेत संपवा. तारीख उलटून गेलेलं दूध विकत घेऊ नका. निर्जंतूक न केलेलं दूध फ्रीजमध्ये ठेवलं तरी त्यात ई कोलायसारखे जंतू निर्माण होऊ शकतात. तसंच अशा दुधात विविध बॅक्टेरियांची वाढही होते. त्यामुळे फ्रीजमध्ये ठेवलेली कोणतीही वस्तू भरपूर टिकते असं अजिबात समजू नका.

* फळांमधल्या आम्लामुळे त्यांचे रस बॅक्टेरियांपासून सुरक्षित असतात. पण भाज्यांच्या रसांचं तसं नसतं. घरी काढलेला भाज्यांचा ताजा रस असो वा बाजारातला, त्यात बॅक्टेरियांची वाढ खूप लवकर होते. त्यामुळे असे रस पटकन संपवून टाका. कालावधी उलटून गेलेले डबाबंद रस पिऊ नका.



* कोणतीही प्रक्रिया न केलेले फळांचे थंड रस जंतूमुक्त असतीलच असं नाही. फक्त ते थंड आहेत म्हणून आंधळेपणाने पिऊ नका. असे रस बराच काळ ताजे राहण्याची कोणतीही खात्री नसते.


* कोणतेही पदार्थ किंवा पेयं फ्रीजमध्ये योग्य स्थितीत किंवा तापमानाला साठवले नाहीत तर खराब होऊ शकतात. फ्रीजमधल्या थंड वातावरणामुळे पदार्थांच्या चवीवर परिणाम होतो. त्यांचा दर्जा कमी होतो. त्यामुळे सुपरमार्केट किंवा मॉलमधून खरेदी करताना पदार्थ नीट साठवला आहे ना, याची खात्री करून घ्यावी.

# पचनसंस्थेसंबंधित विकारांचे अव्हान

आरोग्यवेध

भारतात गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिकल (पचनसंस्थेशी संबंधित) आजार हे एक गंभीर सार्वजनिक आरोग्य आव्हान म्हणून उदयास येत आहेत. देशातील प्रचंड लोकसंख्येतील विविधता, वेगाने होत असलेले नागरीकरण, बदलती जीवनशैली आणि आहाराच्या सवयी यांमुळे या आजारांचे प्रमाण वाढत आहे. या आजारांचा व्याप मोठा आहे. पोट फुगणे, अपचन, गॅस्ट्रोइसोफेजियल रिफ्लक्स डिसीज (जीआरईडी) आणि इरिटेबल बाऊल सिंड्रोम (आयबीएस) ते गंभीर आजारांपर्यंत पसरलेला आहे. यामध्ये इन्फ्लेमेटरी बाऊल डिसीज (आयबीडी), दीर्घकालीन यकृत विकार, पॅन्क्रियाटोबिलिअरी आजार आणि जठरांत्रीय कर्करोग यांचा समावेश होतो. या आजारांचा वाढता भार अधिक जनजागृती, लवकर निदान आणि मजबूत आरोग्यसेवा धोरणांची तातडीची गरज अधोरेखित करतो.

नागरीकरण आणि जीवनशैलीतील बदल यांचा जठरांत्रीय विकारांच्या वाढत्या प्रमाणावर मोठा प्रभाव पडला आहे. लठ्ठपणा, चरबीयुक्त आहार, अनियमित जेवणाच्या सवयी आणि निष्क्रिय जीवनशैली यांमुळे शहरांतील जवळपास पाचपैकी एक व्यक्ती 'जीईआरडी' ने प्रभावित आहे. ताणतणावाशी संबंधित कार्यात्मक विकार असलेला 'आयबीएस' देखील मोठ्या प्रमाणावर आढळतो; मात्र कमी नोंद आणि उशिरा निदानामुळे त्याच्या प्रादुर्भावाचे अंदाज मोठ्या प्रमाणात बदलतात. 'आयबीडी' पूर्वी भारतात दुर्मिळ मानला जात होता, तो आता महानगरांमध्ये अधिक प्रमाणात दिसून येत आहे. यामागे पाश्चात्त्य आहारपद्धती, आतड्यातील मायक्रोबायोटामधील बदल आणि पर्यावरणीय घटक कारणीभूत आहेत.



हिपॅटायटिस बी आणि सी, मद्यपानामुळे होणारे यकृत विकार आणि नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज (एनएएफएलडी) यांसारखे यकृताचे आजार देशभरात लाखो लोकांना प्रभावित करत असून मोठा आजारभार निर्माण करतात. याशिवाय, भारतात जठर आणि अन्ननलिकेच्या कर्करोगाचे प्रमाणही जास्त आहे. ते तंबाखू सेवन, मद्यपान, आहाराच्या सवयी आणि हेलिकोबॅक्टर पायलोरीसारख्या दीर्घकालीन संसर्गाशी संबंधित आहे.

या वाढत्या आजारभारामागे अनेक घटक कारणीभूत आहेत. प्रक्रिया केलेले अन्न, साखर आणि अपायकारक चरबीने समृद्ध आहार यामुळे सिड रिफ्लक्स, फॅटी लिव्हर आणि चयापचयाशी संबंधित विकारांचा धोका वाढतो. शारीरिक हालचालींचा अभाव आणि वाढता ताणतणाव 'आयबीएस' आणि 'जीईआरडी' सारख्या स्थितींना अधिक गंभीर बनवतो. काही भागांमध्ये स्वच्छता आणि स्वच्छतेचा अभाव असल्यामुळे जठरांत्रीय संसर्ग होण्याची शक्यता वाढते, आणि उपचार न झाल्यास हे संसर्ग दीर्घकालीन आजारात रूपांतरित होऊ शकतात.

वैद्यकीय विज्ञानात प्रगती असूनही भारतातील आरोग्यव्यवस्थेला या आजारांचा प्रभावीपणे सामना करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. शहरी भागांमध्ये तज्ज्ञ सेवा उपलब्ध असल्या, तरी ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये प्रशिक्षित तज्ज्ञांचा अभाव असल्यामुळे निदान उशिरा होते आणि उपचारांचे परिणाम कमी प्रभावी ठरतात. सुरुवातीच्या लक्षणांविषयी जनजागृती कमी असल्यामुळे ही समस्या अधिक तीव्र होते. त्यामुळे शिक्षण आणि प्रतिबंधात्मक आरोग्य उपक्रमांची गरज अधोरेखित होते. या आव्हानाला तोंड देण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. यामध्ये जनजागृती मोहिमा, जीवनशैलीत बदल घडवणारे कार्यक्रम, तज्ज्ञ उपचारांपर्यंत सुधारित पोहोच आणि संशोधन व देखरेख यंत्रणा मजबूत करणे यांचा समावेश होतो. संतुलित आहार, नियमित शारीरिक व्यायाम, ताणतणाव नियंत्रण आणि वेळेवर वैद्यकीय सल्ला घेतल्यास आजारांचा भार लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो.

# इमारतीच्या नूतनीकरणातून बँकेच्या कामकाजात वेग वाढविण्याचा संकल्प साकार

**सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे प्रतिपादन; जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्टेशन रोड शाखा व मुख्य कार्यालय इमारतीचे नूतनीकरण व 'ई-लॉबी 'चे उद्घाटन**





जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्टेशन रोड शाखा व मुख्य कार्यालय इमारतीचे नूतनीकरण व 'ई-लॉबी 'चे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते व जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडले.

नगर - सहकार चळवळ हा सामाजिक व आर्थिक विकासाचा भक्कम पाया आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही ग्रामीण भागातील शेतकरी, महिला बचतगट, लघुउद्योजक व सर्वसामान्य कुटुंबांसाठी आर्थिक आधारस्तंभ आहे. या इमारतीच्या नूतनीकरणातून केवळ भौतिक सुविधा सुधारल्या नसून बँकेच्या कामकाजात गुणवत्ता, पारदर्शकता आणि वेग वाढविण्याचा संकल्प साकार झाला असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्टेशन रोड शाखा व मुख्य कार्यालय इमारतीचे नूतनीकरण व 'ई-लॉबी 'चे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते व जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप, आमदार मोनिकाताई राजळे, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी आमदार नरेंद्र घुले, अक्षय कर्डिले, बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले पाटील, उपाध्यक्ष माधवराव कानवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब लक्ष्मण वर्पे, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) मंगेश सूरवसे आदी उपस्थित होते.

सहकार मंत्री श्री.पाटील म्हणाले, मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उत्कर्षामध्ये अनेकांचा मोलाचा वाटा आहे. राज्यातील अग्रगण्य बँकांमध्ये अहिल्यानगर येथील या बँकेची गणना केली जाते. सध्या २८७ शाखांच्या माध्यमातून बँक लाखो ग्राहकांशी जोडली गेली आहे. शेतकऱ्यांना पीककर्ज, अल्पमुदतीचे कर्ज तसेच विविध आर्थिक सुविधा देत बँक ग्रामीण अर्थव्यवस्थेला भक्कम आधार देत आहे. खासगी बँकांच्या बरोबरीने आधुनिकीकरण करून बँकेने जिल्ह्याच्या वैभवात मोलाची भर घातली आहे. स्व. शिवाजीराव कर्डिले यांनी पाहिलेले बँकेच्या उत्कर्षाचे स्वप्न आज साकार होत असून त्यांची उणीव सदैव जाणवत राहील, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

### शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक

जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे काळाची गरज बनली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा आज सर्वच क्षेत्रांमध्ये प्रभावी वापर होत असून पारंपरिक शेतीतही बदल घडवून आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारणे आवश्यक आहे. तरुणांनी तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून शेती समृद्ध करण्यासाठी पुढाकार घ्यावा व जिल्ह्यातील ऊस उत्पादकता वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षाही पाटील यांनी व्यक्त केली.

तसेच, सहकार चळवळीला अधिक बळकटी देण्यासाठी केंद्र शासनाने सहकार मंत्रालयाची स्थापना केली असून केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्या माध्यमातून या क्षेत्राला न्याय देण्याचे कार्य सुरू आहे. सहकारी सोसायट्या केवळ कर्जपुरवठ्यापुरत्या मर्यादित न राहता शासनाच्या ५१ विविध योजनांचा समावेश करून त्यांना अधिक सक्षम व सर्वसमावेशक बनविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले.

### नूतनीकृत इमारतीमधून ग्राहकाभिमुख सेवा देण्याची बांधिलकी अधिक दृढ

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, जिल्ह्याची सहकार परंपरा समृद्ध असून, या बँकेने अनेक वर्षे ग्रामीण भागाच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले आहे. नूतनीकरण झालेली ही इमारत म्हणजे नव्या युगाची सुरुवात असून, ग्राहकाभिमुख सेवा देण्याची बांधिलकी अधिक दृढ झाली आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेचा चेहरामोहरा बदलण्याचे काम होत आहे. जिल्ह्यातील शेतकरी व सहकारी कारखानदारीच्या उत्कर्षासाठी बँक सातत्याने काम करत आहे. पारदर्शकता व शिस्त पाळत सर्वसामान्यांची कामधेनू म्हणून ही बँक पुढे आली आहे.

स्व. शिवाजीराव कर्डिले यांनी बँकेचा कायापालट करण्याचे जे स्वप्न पाहिले होते, त्याची पूर्तता आज या निमित्ताने होत आहे. जिल्ह्याच्या विकासामध्ये त्यांनी केलेल्या अविरत प्रयत्नांमुळे आज त्यांची उणीव प्रकर्षाने जाणवते. देशपातळीवर पहिले सहकार मंत्रालय स्थापन होऊन सहकार चळवळीला एक नवे रूप मिळत आहे. ही चळवळ निकोप वाढीस लागण्याच्या दृष्टीने व्यापक काम करण्याची गरज आहे. बँकांनी बचतगटांना अधिकाधिक कर्जपुरवठा करून महिलांना अधिक सक्षम करावे, असे आवाहनही डॉ. विखे पाटील यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले पाटील म्हणाले, बँकेच्या नूतनीकरणामुळे कामकाज अधिक कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक होणार आहे. सध्या बँकेत ११ हजार २८७ कोटी रुपयांच्या ठेवी असून, या भक्कम आर्थिक पायावर बँक स्पर्धात्मक धोरण स्वीकारून पुढे जात आहे. डिजिटल पेमेंटची सुसज्ज व्यवस्था उभारण्यात येत असून, स्वतःचा 'क्यूआर कोड' असलेली बँक म्हणून लवकरच तिची ओळख निर्माण होईल.

शेतकरी व ग्राहकांच्या सोयीसाठी अल्पमुदतीच्या कर्जाचे मध्यम मुदतीत रूपांतर करण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास बँकेचे पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, तसेच ग्राहक व नागरिक उपस्थित होते.

# लग्नाच्या आमिषाने अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला पकडले



अल्पवयीन मुलीवर लग्नाच्या आमिषाने अत्याचार करणाऱ्या आरोपीला पकडल्या नंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर - कल्याण रोडवरील लोंढे मळा येथील अल्पवयीन मुलीला लग्नाचे अमिष दाखवुन बळजबरीने शारीरीक संबंध ठेवुन गर्भवती करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. हमीद शौकत सय्यद (वय २४, रा. लोंढे मळा, कल्याण रोड) असे या आरोपीचे नाव आहे.

आरोपी हमीद सय्यद याने १७ वर्षीय अल्पवयीन मुलीशी तिचे अज्ञानाचा गैरफायदा घेवुन तसेच तिला लग्नाचे अमीष दाखवुन वारंवार तिच्याशी शारिरिक संबंध ठेवुन तिला गर्भवती केले होते. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात अत्याचारासह पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर आरोपी पसार झाला होता. या आरोपीच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि.किरणकुमार कबाडी यांनी उप निरीक्षक दिपक मेढे, पोलीस अंमलदार गणेश लबडे, फुरकान शेख, दिपक घाटकर, बाळासाहेब नागरगोजे, सुनिल मालणकर, योगेशे कर्डिले, महिला पोलीस अंमलदार भाग्यश्री भिटे, ज्योती शिवाजी शिंदे, सुर्वणा गोडसे, उत्तरेश्वर मोराळे, अर्जुन बडे यांचे पथक नियुक्त केले होते. सदर पथक आरोपीचा शोध घेत असताना २१ फेब्रुवारी रोजी पथकाला आरोपी हमीद शौकत सय्यद हा आण्णाभाऊ साठे चौक, लाल टाकी येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने सदर ठिकाणी जावून त्यास पकडले. या आरोपीला पुढील तपासासाठी तोफखाना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# जिल्हा बँकेच्या शिवाजीराव कर्डिले सभागृहाचे उद्घाटन



बँकेच्या चाहुराणा बुद्रुक येथील तालुका विकास अधिकारी कार्यालयाच्या इमारतीत लोकनेते स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले सभागृहाचे उद्घाटन प्रसंगी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रशेखर घुले, डॉ.सुजय विखे, अक्षय कर्डिले आदी. (छाया - लहू दळवी)

नगर - जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चाहुराणा बुद्रुक येथील नवनिर्मित तालुका विकास अधिकारी कार्यालयाच्या इमारतीत लोकनेते स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले सभागृहाचे उद्घाटन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार संग्राम जगताप, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील, व्हाईस चेअरमन माधव कानवडे, संचालक अंबादास पिसाळ, गीतांजली शेळके, अक्षय कर्डिले, माजी आमदार तथा बँकेचे संचालक भानुदास मुरकुटे, जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे, अहिल्यानगर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सूळ आदींसह सर्व संचालक, नगर तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते नूतनीकरणाच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना जिल्हा बँकेचे संचालक अक्षय कर्डिले म्हणाले, स्वर्गीय कर्डिले यांच्या पुढाकारातून या नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले. त्यांचे सतत या कामावर बारकाईने लक्ष होते. स्वर्गीय कर्डिले यांनी प्रदीर्घकाळ जिल्हा बँकेचे संचालक तसेच अध्यक्ष म्हणून धडाडीने काम केले. बचत गटाच्या महिला, सर्वसामान्य शेतकरी यांना पतपुरवठा करीत सक्षम करण्यावर त्यांचा नेहमीच प्राधान्यक्रम राहिला. जिल्हा बँकेची ओळख 'शेतकऱ्यांची बँक' अशी व्हावी, या भावनेतून त्यांनी काम केले. त्यांचे अकाली निधन झाले. त्यांची उणीव सदैव भासत राहील. स्वर्गीय कर्डिले यांच्या निधनानंतर माझ्यासह कर्डिले परिवारातील सर्व सदस्यांना पालकमंत्री विखे पाटील तसेच राज्यासह जिल्ह्यातील मान्यवरांनी दिलेला धीर मोलाचा आहे. कर्डिले यांच्या विचाराचा वारसा आणि कामाची प्रेरणा बाळगून पुढे जाऊ. अशी भावना अक्षय कर्डिले यांनी यावेळी व्यक्त केली.

# मागासवर्गीयांच्या १५% निधीचा विनियोग न करणाऱ्या ग्रामपंचायतींची चौकशी करा

**वंचित बहुजन आघाडीची जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे मागणी**



अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या कल्याणासाठी राखीव असलेला १५% निधी सलग तीन वर्षे खर्च न झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या विषयावर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भंडारी यांची भेट घेऊन दोषींवर कारवाईची मागणी केली.

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतीं- मध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या कल्याणासाठी राखीव असलेला १५% निधी सलग तीन वर्षे खर्च न झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या विषयावर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भंडारी यांची भेट घेऊन दोषींवर कारवाईची मागणी केली.

शासकीय नियमानुसार ग्रामपंचायतीने स्वनिधीतील १५% हिस्सा मागासवर्गीय घटकांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक ग्रामपंचायतींनी सन २०२३, २०२४ आणि २०२५ या तीन वर्षांत हा निधी खर्च केला नाही. स्थानिक सदस्य आणि ग्रामस्थांनी वारंवार लेखी विनंती करूनही सरपंच व ग्रामसेवकांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. हा निधी जाणीवपूर्वक 'लॅप्स' केला जात असल्याचा आरोप आघाडीने केला आहे.

तक्रारीची दखल घेत सीईओ आशिष भंडारी यांनी संबंधित विभागाला तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

* निधी खर्च न करणाऱ्या ग्रामपंचायतींची उच्चस्तरीय चौकशी करून श्वेतपत्रिका जाहीर करावी.

* कर्तव्यात कसूर करणाऱ्या सरपंच व ग्रामसेवकांवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमांतर्गत कडक कारवाई व्हावी.

* येत्या ७ दिवसांत प्रशासनाने लेखी उत्तर देऊन कार्यवाही सुरू करावी.

प्रशासनाने विहित मुदतीत ठोस पावले न उचलल्यास पंचायत समितीवर जन आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा योगेश साठे यांनी दिला. यावेळी आगडगावचे ग्रामपंचायत सदस्य क्रांती शिरसाठ, जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, रवींद्र शिरसाठ, अशोक भिंगारदिवे, हिरामण भिंगारदिवे, देवराम भिंगारदिवे यांच्यासह पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# गॅस सिलिंडर वेळेत उपलब्ध करून ग्राहकांच्या समस्या त्वरित सोडवा



हेमा बढे

नगर - गॅस सिलिंडर नोंदणी आणि वितरणाबाबत ग्राहकांच्या अनेक तक्रारी येत आहेत. वितरकांनी या समस्या प्राधान्याने सोडवून ग्राहकांना वेळेत सिलिंडर उपलब्ध करून द्यावे. तसेच, गॅस वितरणाबाबत तक्रार असल्यास नागरिकांनी १९०६ या राष्ट्रीय हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बढे यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

श्रीमती बढे यांनी सांगितले, प्रत्येक गॅस वितरण केंद्रावर तक्रार क्रमांक ठळकपणे लावण्यात यावा व वितरकांनी ग्राहकांशी सौजन्याने वागावे. यासोबतच, नागरिकांना अखंडित वीजपुरवठा मिळेल आणि त्यांच्या तक्रारी प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी विद्युत विभागाला दिल्या.

महापालिका क्षेत्रातील नागरिकांच्या स्वच्छतेबाबतच्या तक्रारींचा तातडीने निपटारा करावा, शहरात वाहतुकीला अडथळा होणार नाही अशा पद्धतीने पार्किंगचे नियोजन करावे, भटक्या जनावरांचा बंदोबस्त करावा आणि अतिक्रमण मोहीम अधिक तीव्र करावी, असे निर्देशही श्रीमती बढे यांनी यावेळी दिले.

या बैठकीत केवळ शहरच नव्हे, तर ग्रामीण भागातील प्रश्नांवरही चर्चा झाली. खतांची सक्तीने लिंकिंग करणारे विक्रेते आणि दुधात भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच विविध शासकीय विभागांमध्ये येणारे तक्रार अर्ज तातडीने स्वीकारण्यावर भर देण्यात आला.

या बैठकीला महानगरपालिकेचे उपायुक्त मेहेर लहारे, सहाय्यक पुरवठा अधिकारी एम. के. चौधरी, अन्नधान्य वितरण अधिकारी सपना भोवते यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच, अशासकीय सदस्य विलास जगदाळे, प्रा. अमिता प्रीतमसिंग रानू-कोहली, अशोक शेवाळे, डॉ. राजेंद्र पर्वती कळमकर, डॉ. विलास सोनवणे व प्रकाश रासकर यांनी या चर्चेत सक्रिय सहभाग घेतला.

# पूर्ववैमनस्यातून तरुणाला केबलने बेदम मारहाण

नगर - शहरातील चांदणी चौक परिसरात जुन्या भांडणाच्या कारणावरून एका तरुणाला लाथाबुक्क्यांनी आणि इलेक्ट्रिक केबलने बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी अनिकेत शिंदे (रा.शास्त्रीनगर, केडगाव) याच्यासह पाच अनोळखी व्यक्तींविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बाळासाहेब सुखदेव कांबळे (वय ४२, रा. उक्कडगाव, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास चांदणी चौक परिसरातून जात होते. यावेळी आरोपी अनिकेत शिंदे आणि त्याच्यासोबत असलेल्या इतर पाच जणांनी संगनमत करून कांबळे यांना अडवले. 'मागील भांडणाचा राग मनात धरून' आरोपींनी कांबळे यांना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

भांडणाचे रूपांतर लवकरच हाणामारीत होवून आरोपींनी कांबळे यांना जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. एका आरोपीने काळ्या रंगाच्या इलेक्ट्रिक केबलने कांबळे यांना मारहाण केली. यावेळी आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिली. जखमी अवस्थेत कांबळे यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार घेतल्यानंतर त्यांनी २० फेब्रुवारी रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला असून अधिक तपास पोलीस हवालदार इनामदार करत आहेत.

# शिंगणापूर मंदिर, गावाच्या बाहेरील परिसरात मनाई आदेश जारी


नगर - शिंगणापूर, ता. नेवासा गावात, मंदिर तसेच गावाच्या बाहेरील सार्वजनिक रस्ते, चौक, बसस्थानक, प्रवेशद्वार किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी होत असलेला अडथळा किंवा उपद्रव होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच शिंगणापूर गावातव मंदिर परिसरात सार्वजनिक शांतता, सुरक्षितता व सोयीसाठी उपविभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी त्यांना प्राप्त अधिकाराचा वापर करत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम १५२ (१) (र) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

शिंगणापूर गावाच्या बाहेरील सार्वजनिक रस्ते, चौक, बसथांबे, प्रवेश मार्ग किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी उभे राहून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना थांबवणे, दिशाभूल करणेअथवा मध्यस्थी करणे या कृत्यास तात्काळ प्रतिबंध करण्यात आला आहे. कोणत्याही व्यक्तीने देवस्थान ट्रस्ट किंवा प्रशासनाचा अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवू नये व भोजन, निवास किंवा दर्शनाच्या नावाखाली अनाधिकृत कृत्य करु नये.

असे कृत्य करणाऱ्या संबंधित व्यक्तींनी तात्काळ अशा सार्वजनिक ठिकाणावरुन हटावे व भविष्यात अशा स्वरुपाची कृत्ये करु नयेत. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही आदेशान्वये देण्यात आला आहे.

# मार्शल आर्ट व क्रीडा कलेचा किमयागार : प्रा. संजय धोपावकर

**(निवृत्त क्रीडा संचालक सारडा महाविद्यालय)**



(सेवानिवृत्ती प्रित्यर्थ आमचे (वर्गमित्र) संजय धोपावकर यांचा रविवारी दु.४ वा. माऊली सभागृह येथे समारंभपूर्वक सन्मान सोहळा होत आहे. यानिमित्त आमच्या या मित्राला आमच्याही शुभकामना...)

''आयुष्यात मनासारखे काम, नोकरी, व्यवसाय करावयास मिळणे आणि त्यातूनही नवनिर्मिती घडवता येणे, समाजासाठी काहीसं मोठ व विधायक कार्य करता यावं यासारखी दुसरी साफल्याची, समाधानाची गोष्टी नाही.''

हे सांगण्याचं कारण म्हणजे धोपावकर सरांची यशस्वी सेवापूर्ती. प्रा. संजय, आमचा शालेय मित्र संजू. यानिमित्त क्रीडा रसिक व आपणास त्याच्या यशस्वी क्रीडा कारकीर्दीविषयी माहिती देण्यासाठी हा शब्दप्रपंच.

फ्लॅशबॅकमध्ये जाणे स्वाभाविक! आम्हाला आठवायला लागलय. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे ते मोठे मैदान. तिथेच आमच्या क्रीडा करिअरचा श्री गणेशा झाला होता. पण या खेळांमुळे पुढे खूप मोठी झेप घेता येईल हे तेव्हा गावीही नव्हते. त्या निष्पाप विश्वात निकोप स्पर्धा व खेळभावना राहायची. तेव्हा तर खुद्द संजूला टी शर्ट मिळण्याचे आकर्षण वाटायचे.

खेळाडू म्हणून पदकं, नाव, किर्ती मिळवण्याची खरी सुरुवात झाली ती महाविद्यालयीन काळापासून. माझं कॉलेज न्यू आर्टस् झालं तर सांजूचं सारडा कॉलेज. या सारडा कॉलेजमध्ये त्याच्या कारकिर्दीला परिपूर्ण आकार लाभला. स्व. दिनूभाऊ कुलकर्णी व प्रा. दिलीप कर्डिले यांनी त्याला घडवले. विविध वैयक्तिक क्रीडा प्रकारात त्याने भाग घेऊन प्राविण्य मिळवले. ४ x १०० रिलेमध्ये राष्ट्रीय स्पर्धे पर्यंत धडक मारली. शरीर सौष्ठव प्रकारात मधुकर गायकवाड सरांच्या मार्गदर्शनात त्याने युवा भारतश्रीचा मान मिळवला. पण त्याचा ओढा ज्युडोकडे अधिक होता व राहिला.

मध्यंतरी वडिलांच्या निधनानंतर त्याच्या दोन्ही मोठ्या बंधुंना मुंबईस जावे लागले तेव्हापासून आई व संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्याने घेतली व सांभाळली ती आजच्या दिवसापर्यंत. हेही महत्त्वाचे.

खेळाडू म्हणून करिअर घडवतानाच संबंधित कोर्स करुन त्याच सारडा महाविद्यालयात त्याने क्रीडा शिक्षकाची जबाबदारी घेतली व आज तो समाधानपूर्वक सेवानिवृत्त होत आहे.

मार्शल आर्ट प्रमाणेच विविध क्रीडा कलाकार अर्थात खेळाडू घडवणारा तो निष्ठावान किमयागार ठरला. २ तपाच्या नोकरीत अक्षरश: हजारो खेळाडू घडवणाऱ्या प्रा. संजय सरांनी त्यातल्या शेकडोंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्यास मार्गदर्शन, सहकार्य, प्रोत्साहन दिले.

याचे प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे दिशान गांधी. त्याचा आवडता खेळ आहे बास्केटबॉल. पण संजू सरांनी त्याचे गुण हेरुन त्याला नेटबॉल, कॉर्फबॉल खेळण्यास प्रोत्साहीत केले. आज दिशान देशाचे प्रतिनिधीत्व आंतरराष्ट्रीय स्तरावर करत आहे. खरे तर अजूनही या खेळाची प्राथमिक ओळखही विद्यार्थी, पालकांना नाही.

पण सरांसह सारडा कॉलेज व हिंद सेवा मंडळाच्या सहकार्याने आज सारडा कॉलेजच्या प्रांगणात कॉर्फ बॉलचे बहुदा जिल्ह्यातील एकमेव मैदान उभारले आहे. अ.नगर जिल्हा कॉर्फबॉल असोसिएशनच्या माध्यमातून मुलामुलींना तयार करण्याचा आमचा प्रयत्न चालू झाला असून संजू सरही त्यात ॲक्टीव्ह आहेत. आजच्या क्रिकेटच्या प्रसिद्धीत इतर खेळांना जीवंत ठेवत, ज्युडोची राष्ट्रीय पातळीवर आपल्या शहराची ओळख निर्माण करीत, क्रीडा संस्कृती बळकट करणाऱ्या प्रा. संजय सरांना साऱ्या क्रीडा रसिकांच्या वतीने धन्यवाद देतानाच यापुढेही त्यांना उत्तम आरोग्य लभून अधिक क्रीडा सेवा घडो यासाठी शुभेच्छा देऊ या.

प्रा. संजय सरांचा मुलगा आदित्य हा कुराश क्रीडा प्रकारात आशियाई स्पर्धेत प्रभावीपणे खेळला असून कन्या कु. ऐश्वर्या हिने युके येथे स्पोर्टस् सायकॉलॉजीमध्ये एम.एस. हे अती उच्च शिक्षण घेतले असून त्यांच्या संपूर्ण प्रवासात सरांची पत्नी सौ. पद्मजा वहिनींची साथ मोलाची आहे.

- **किशोर गांधी** (माजी क्रिकेटपटू) मो.बा.९८२२०२०६९१

